डिजीटल आवृत्ती

मासिक

# शिक्षण यात्री

▪ वर्ष:५ वे ▪ अंक: ८ वा ▪ ऑगस्ट २०२० ▪ किंमत:४० रूपये



# लेखकांसाठी सुचना

१. लेखांचा विषय प्रचलित आणि संक्षिप्त असणे आवश्यक आहे.

२. प्रकाशित करणाऱ्या येणाऱ्या लेखांची शब्दमर्यादा १००० ते २००० असावी आणि लेख संगणकीकृत करून shikshanyatri11@gmail.com, pragatiartsshirpur@gmail.com या मेलवर पाठवावी.

३. संगणकीकृत केलेल्या मुद्रित अक्षरांसाठी (श्रीलिपी देव ७०८) Shree lipi- Dev708 /google marathi/ mangal font फॉन्ट साईज १५ असावे.

४. स्वीकृत करण्यात येणाऱ्या लेखांचे पुनर्संस्कारित करण्याचे सर्व हक्क संपादक मंडळाकडे राहतील.

५. लेखात अद्यावत माहिताचा वापर करून भाषा सुस्पष्ट व समजण्यास सोपी असावी.

६.लेखकाने प्रथम पृथ्वावर लेखाचे शीर्षक, लेखकाचे नाव, पासपोर्ट साईज फोटो, भ्रमणध्वनी व पिनकोडसह पत्ता अवश्य द्यावा.

७. लेख पाठवितांना लेखकांकडून अनेकवेळा टंकलेखनामध्ये चुका होत असल्याचे आढळते, त्यामुळे वाक्यांचा संदर्भ लागत नाही. तरी कृपया लेख पाठवितांना पुन्हा एकदा काळजीपूर्वक वाचन करून पाठवावा.

८. मासिकाच्या वर्गणीचे धनादेश व डिमांड ड्राफ्ट – शिक्षणयात्री या नावाने संपर्क पत्त्यावर पाठवावेत.

संपर्क :शिक्षणयात्री क्रांतीनगर ता.शिरपूर जि.धुळे चलभाष : 8208301001 shikshanyatri11@gmail.com

वाचन लेखन चळवळीला वाहिलेले मासिक

वर्ष : ५ वे

अंक:८ वा ऑगस्ट २०२०

• मार्गदर्शक •

मा.पुरूषोत्तम भापकर (भाप्रसे)

• मानद संपादक •

सुभाषदादा कुलकर्णी

• कार्य.संपादक •

संदेश नंदकिशोर हजारे

• संपादन सहाय्य •

प्रा.डॉ.माधव कदम

युवराज माने

•प्रतिनिधी सहाय्य•

**पुणे-** रमेश काळे, **मुंबई-** जयपाल गिरासे, **नाशिक-**किरण पाटील, **सोलापूर-** उमेश काळे, **औरंगाबाद-** रवि गारूडकर, **परभणी-** युवराज माने, **जळगांव-** प्रविण माळी, **नंदुरबार-** तुकाराम धनगर, **अमरावती-** रूपेश माने, **कोल्हापूर -** गुलाब बिसेन,**सातारा -** विनोद भोजने, **बीड -** अनंत दिक्षित, **लातूर -** पंढरीनाथ चिभडे,

• अंक मांडणी •

प्रगती आर्टस्,शिरपूर धुळे

- लेखात व्यक्त झालेली मते लेखकांची व्यक्तिगत समजावी
- पीआरबी ॲक्टनुसार कायदेशीर जबावदारी कार्य.संपादकांची राहील
- सर्व दावे शिरपूर न्यायकक्षेंतर्गत

# अंतरंग...

३ आता वेध अंमलबजावणीचे

७ शैक्षणिक धोरण २०२०

९ शिक्षणाचे माध्यम

११ कुठल्या बिया पेरायच्या?

१५ शवपुष्प

१९ फाजील आत्मविश्वास

२२ करोना आणि मी...

२४ टिलीमिली नवसंजीवनी

२६ ज्ञान तंत्रज्ञान

२७ रंगीत दुरदर्शन

२८ चढ उतार क्रिडा क्षेत्रातील

**मासिका विषयी ...**

ऑगस्ट २०२०

नोंदणी क्रमांक RNI No.MAHMAR2015/67226

वर्गणी : वार्षिक₹ ५००, द्विवार्षिक₹ १०००, त्रैवार्षिक १५००

संपर्क : शिक्षणयात्री क्रांतीनगर ता.शिरपूर जि.धुळे ४२५४०५.

चलभाष : 8208301001 Email:shikshanyatri11@gmail.com

# स्वागत नवीन शैक्षणिक धोरणाचे !

## सं वा द की य

शिक्षण हे देशाच्या विकासाच्या प्रमुख मार्ग आहे. विकसीत देशांचा विकासच शिक्षणाच्या जोरावर झाले. राष्ट्रीय विकास साधतांना भौतीक संधानापेक्षा सर्वात महत्वाची साधन संपत्ती म्हणजे मानव. म्हणून मानव व शिक्षण या दोन्ही बाजू विकसित झाल्याशिवाय राष्ट्रविकास शक्य नाही. उत्तम, सुजाण नागरिक शिक्षणाच्या माध्यमातून घडवता येऊ शकते. समाजपरिवर्तनात शिक्षण महत्वाची भुमिका बजावत असते. शिक्षणाचा पाया मजबूत असला की देशाच्या विकासाचा मार्ग सुकर होतो. भावी सक्षम नागरीक घडवण्यासाठी शिक्षण गरजेचे.

म्हणूनच १९८६ च्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानंतर म्हणजेच ३४ वर्षानंतर राष्ट्रीय शैक्षणिक धारेण २०२० मंजूर झाल्याने येत्या काही वर्षात याची फळे दिसायला लागणार आहे. शिक्षणाचा सारा उहापोह या निमित्ताने मांडून बदलत्या जगाच्या प्रवाहात भारतीय नागरीक टिकायला हवा. कारकुनी शिक्षणापेक्षा कौशल्यपूर्ण हात घडायला हवेत. यासाठी धोरण आवश्यक होते.

स्वातंत्र्यपूर्व काळापासून आतापावेतो शिक्षणाचा गाडा सुरळीत चालण्यासाठी मार्गदर्शक तत्वे, धोरणे आखली गेली. सुधारणा होत गेल्या. समस्यांचा अभ्यास केला गेला. काही सुचना अमलात आल्या तर काही तशाच बासनात राहिल्या. स्वातंत्र्यपूर्व काळात चार्टर ॲक्ट १८१३, मेकॉलेचा जाहिरनामा १८३४, वूडचा खलिता १८५४, हंटर आयोग १८८२, कर्झन विद्यापीठ आयोग १९०२, राधाकृष्णन आयोग १९४८ मुदलियार आयोग १९५२, दुर्गाबाई देशमुख आयोग १९५८, कोठारी आयोग १९६४, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण १९६८, ईश्वरभाई पटेल समिती, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण १९८६, चट्टोपाध्याय आयोग, यासह अनेक आयोगाच्या चर्चातून देशाचा शैक्षणिक विकास साधण्याचा प्रयत्न झाला. शिक्षणाचे माध्यम, रचना, अभ्यासक्रम, आकृतीबंध, सार्वत्रिकीकरण, विविध योजनांच्या शिफारसी मांडल्या गेल्या. अमलात आल्या वा काही आल्या नाही. परंतू १९८६ नंतर ठोस असे धोरण मांडले नव्हते. त्याची आवश्यकता वाटत असतांना २०२० चे शैक्षणिक धोरणाने सर्वांच्या आशा वाढल्या आहेत.

नवीन शैक्षणिक धोरणातील शिफारशींचा अंमल कधी सुरू होईल किंवा कसे? काय? होईल या प्रश्नांचा गुंता सोडवतांनाच २०२१-२३ ही वर्षे महत्वाची असल्याचे सुतोवाच अधिकारी मंत्री करीत आहेत. ते पहाता येत्या दशकात भारताची शैक्षणिक रचना बदलून नव्या पिढीला नवीन धोरणानुसार शिकायला मिळणार आहे. पुर्व प्राथमिक पासूनच उच्च शिक्षणापर्यंत केजी टू पीजी होणाऱ्या बदलांची, सुधारणांची, शिफारसींची अंमलबजावणीचे वेध साऱ्यांनाच लागलेत.

मात्र यानिमित्ताने प्रदीर्घ कालखंडानंतर जुन्या शिक्षणाचा आकृतीबंधातून सुटका होऊन नवीन आकृतीबंध, अभ्यास कसा? किती ? पेलवला जाईल या नि अशा अनेक प्रश्नांसह नवीन शैक्षणिक धोरणाचे स्वागत करायला हरकत नाही.

टिप : शैक्षणिक लेख,विचार,अनूभव,तसेच स्वरचित कथा कविता पाठवावयाचे असल्यास शिक्षणयात्री shikshanyatri11@mail.com या मेलवर पाठवावा. सोबत स्वत:चे नांव,पत्ता,शाळा,पासपोर्ट साईज फोटो पाठवावा. वर्गणी चेक/डि.डी./मनीऑर्डर 'शिक्षणयात्री' या नावाने संपर्क पत्यावर पाठवावे.

# आता वेध अंमलबजावणीचे

डॉ.वसंत काळपांडे
माजी शिक्षण संचालक
९८२३०५९८०९






येणार येणार म्हणून सर्वजण ज्याची वाट पाहत होतो, ते नवीन राष्ट्रीय धोरण आता जाहीर झालं आहे. केंद्रीय शिक्षण मंत्रालयाचे अधिकारी आणि मंत्री यांची निवेदनं पाहता या धोरणाची अंमलबजावणी लवकरच सुरू होईल असं दिसतं. धोरणातल्या सर्वच मुद्द्यांना एकाच लेखात स्पर्श करणं शक्य नसल्यामुळे या लेखात शालेय शिक्षणाशी निगडित असणाऱ्या काही मोजक्या शिफारशींचा आणि तोही केवळ अंमलबजावणीच्या दृष्टिकोनातून ऊहापोह करण्याचा प्रयत्न केला आहे. कोणत्याही धोरणातल्या शिफारशी भविष्यात केंद्र आणि राज्य सरकारांनी जे निर्णय घ्यायचे आहेत, त्यांची दिशा फक्त दाखवतात. त्याच्या अंमलबजावणीसाठी राज्य सरकारांच्या मदतीनं कृतिकार्यक्रम तयार करावा लागतो. त्यासाठी केंद्रीय शिक्षण मंत्रालयाने तयारी सुरू केली आहे असं दिसतं. नवीन आकृतिबंधशिक्षण हक्क कायद्याची व्याप्ती तीन ते अठरा वर्षांपर्यंत (पूर्वप्राथमिक ते बारावी) वाढवावी, अशी अनेक शिक्षणतज्ज्ञ आणि स्वयंसेवी संस्था यांची मागणी होती. नवीन धोरणात ५+३ +३ +४ असा आकृतिबंध सुचवलेला आहे. पाच वर्षं पायाभूत शिक्षण (तीन वर्षं बालशिक्षण, इयत्ता पहिली आणि दुसरी), तीन वर्षं प्राथमिक शिक्षण (इयत्ता तिसरी ते पाचवी), तीन वर्षं उच्च प्राथमिक शिक्षण (सहावी ते आठवी) आणि चार वर्षं माध्यमिक शिक्षण (नववी ते बारावी) अशी ही विभागणी असेल. शिक्षणासाठी अंगणवाड्या आता शाळांचाच भाग होणार असल्यामुळे ही अडचण दूर होऊ शकेल. पहिली आणि दुसरी या इयत्ता हा बालशिक्षणाचाच भाग मानण्यात आला आहे, ही स्वागतार्ह बाब आहे. प्राथमिक शाळांमध्ये अंगणवाड्यांत शिक्षण देताना शालेय शिक्षण आणि महिला आणि बालकल्याण या दोन विभागांमध्ये उत्कृष्ट समन्वय असणं हे मात्र मोठंच आव्हान असेल. अंगणवाड्यांत शिक्षणाकडे पूर्णपणे दुर्लक्ष, तर खासगी शाळांना जोडून असलेल्या पूर्वप्राथमिक वर्गांत मुलांवर अत्याचार म्हणता येईल, असं औपचारिक शिक्षण, असं दुसरं टोक, अशी सध्याची परिस्थिती आहे. बालशिक्षणासाठी त्यांचं वय, शरीरीरिक आणि मानसिक क्षमता लक्षात घेऊन त्यांच्या मेंदूचा विकास व्हावा या दृष्टीनं खेळ, गाणी, गोष्टी, कृती, कोडी यांच्या माध्यमांतून त्यांना आनंद वाटेल, असा अभ्यासक्रम तयार करून त्याचीच

अंमलबजावणी सर्व ठिकाणी होईल हे कटाक्षानं पाहण्याची गरज आहे. दुसरीपर्यंत वाचन, संभाषण आणि सोपं अंकगणित एवढ्याच बाबी अपेक्षित असून, लेखनाची सुरवात तिसरीपासून होईल. हा बदल मुलांच्या प्रगतीबाबत चुकीच्या कल्पना असणाऱ्या पालकांच्या गळी उतरवणं एक आव्हानच असेल. इयत्ता पाचवीपर्यंत साक्षरता आणि अंकज्ञान यावर भर असेल. शालेय शिक्षणाच्या सर्वच स्तरांवरची कौशल्यं विकसित करण्यासाठी  खेळ, कृती, कोडी, दैनंदिन जीवनाशी सांगड, शोधक वृत्ती, चिकित्सकपणा, सौदर्यदृष्टी आणि सर्जनशीलता वाढीला लागेल अशा उपक्रमांचा वापर करणं अपेक्षित आहे. तीन ते अठरा वर्षांपर्यंतच्या मुलांचं शिक्षण सध्याच्या शिक्षण हक्क कायद्याची व्याप्ती वाढवून सक्तीचं होईल, असे सर्वांना वाटत होतं; परंतु तसं स्पष्ट आश्वासन या धोरणात दिलेलं नाही.महाराष्ट्रात इयत्ता अकरावी-बारावीचे वर्ग महाविद्यालयं, माध्यमिक शाळा आणि स्वतंत्र कनिष्ठ महाविद्यालयं अशा तीन ठिकाणी आहेत. सन १९७५मध्ये प्रशासकीय अडचणींचा विचार करून १०+२  हा आकृतिबंध अंमलात आणताना घेतलेल्या या निर्णयाचा शैक्षणिकदृष्ट्या कोणताही फायदा झाला नाही. उलट +२ हा टप्पा दुर्लक्षित राहिला. अकरावीच्या प्रवेशाचे प्रश्न आणि सीबीएसई, आयसीएसई आणि राज्य मंडळ यांच्यांतली अनिष्ट स्पर्धा याला हीच व्यवस्था कारणीभूत आहे. माध्यमिक  आकृतिबंधातला आता पुन्हा केलेला बदल यशस्वीपणे अंमलात आणणं खूपच गुंतागुंतीचं आणि प्रशासकीय कौशल्य पणाला लावणारं असेल. भिंती निकालीइयत्ता नववी ते बारावी या स्तरावर विज्ञान, कला, वाणिज्य अशा शाखा किवा शालेय, सहशालेय, अभ्यासक्रमेतर उपक्रम अशा भिंती नसतील. सर्वच विषयांना सारखंच महत्त्व असेल. विद्यार्थ्यांना कोणतेही विषय निवडता येतील. भौतिकशास्त्र शिकताना विद्यार्थ्याला संगीत शिकणंही शक्य होईल. भारत, अमेरिका, जर्मनी आणि कोरिया या देशांत व्यवसाय शिक्षण घेतलेल्या व्यक्तींचं प्रमाण अनुक्रमे ५, ५२, ७५ आणि ९६ टक्के आहे. या पार्श्वभूमीवर सर्वच माध्यमिक शाळांत व्यवसायशिक्षणाचे अभ्यासक्रम सुरू होतील अशा रीतीनं विस्तार करण्यात येईल. प्रत्येक विषयात संवादकौशल्यं, सॉफ्ट स्किल्स, अर्थसाक्षरता आणि उद्योजकता विकास ही कौशल्यंसुद्धा माध्यमिक शिक्षणाच्या अभ्यासक्रमाचा भाग असतील. आजवर व्यवसाय शिक्षणाच्या अभ्यासक्रमाला दुय्यम स्थानच दिलं गेलं आहे. दहावीच्या परीक्षेत नापास झालेल्या विद्यार्थ्यांच्या गुणपत्रिकेवर 'कौशल्यविकासास पात्र' असा शिक्का मारून सरकारनं व्यवसाय शिक्षणाचं स्थान आणखीच खाली आणलं आहे. आता नवीन धोरणात सहावीपासूनच विद्यार्थ्यांनी एका तरी व्यवसायात कौशल्य मिळवावे असे म्हटले आहे. इंटर्नशिपचीसुद्धा तरतूद केली आहे. उच्च शिक्षणासाठी प्रवेश घेताना व्यवसाय शिक्षणाचा अभ्यासक्रम पूर्ण केलेला असणं ही अट ठेवली, तर व्यवसाय शिक्षणाला अभ्यासक्रमात सन्मानाचं स्थान मिळू शकेल. भारतकेंद्रित दृष्टिकोन हे नवीन शैक्षणिक धोरणाचं आणखी एक महत्त्वाचं वैशिष्ट्य आहे. गणित, खगोलशास्त्र, धातुकर्म, वैद्यक, वास्तुकला, शिल्पकला, संगीत या क्षेत्रांत भारतीयांनी केलेल्या अभिमानास्पद कामगिरीचा परिचय करून देण्यात येईल. भारतातल्या विविध भागांतल्या कला, साहित्य, चालू घडामोडी, भारतीय भाषांचा अभ्यास यांना अभ्यासक्रमात विशेष स्थान असेल. विद्यार्थ्यांमध्ये सकारात्मक स्वप्रतिमा निर्माण होण्यासाठी हे महत्त्वाचंच आहे; पण त्याचबरोबर प्राचीन भारतीय ज्ञानपरंपरा खंडित का झाली, यापुढे तसं घडू नये यासाठी काय दक्षता घ्याव्या लागतील, हे सांगणंसुद्धा आवश्यक आहे. आधुनिक विज्ञानात लागलेले सर्व शोध आपल्याकडे पूर्वीच लागले होते अशी प्रवृत्ती बळावू नये, याचीही दक्षता घ्यावी लागेल. भाषाविषयक धोरणइयत्ता पाचवीपर्यंत सर्व शिक्षण आता मातृभाषेतच असेल, इंग्रजी माध्यमाच्या शाळा आता बंद होतील, असा गैरसमज गेल्या काही

दिवसांत पसरला होता. धोरणात शिक्षणाचं माध्यम 'शक्यतो' मातृभाषा असावं असं म्हटलं आहे. इयत्ता चौथीपर्यंतच्या शिक्षणाचं माध्यम मातृभाषाच असावं, हे कर्नाटक सरकारचं १९९४चं धोरण सर्वोच्च न्यायालयाच्या घटनापीठानं दिनांक ६ मे २०१४ रोजी रद्दबातल ठरवून मुलांनी कोणत्या भाषेत शिकावं हे ठरवण्याचा अधिकार पालकांचाच आहे आणि त्यात केंद्र किंवा राज्य सरकार हस्तक्षेप करू शकत नाही, असा स्पष्ट निर्णय दिला. भाषामाध्यमाच्या निवडीचं पालकांचं स्वातंत्र्य मान्य करूनही मातृभाषा किंवा परिसर भाषा हेच शिक्षणाचं माध्यम असणं विद्यार्थ्यांची अभिव्यक्ती आणि शैक्षणिक प्रगती यांना पूरक असतं, हेच खरं आहे. प्रचंड पैसा खर्च करून मुलांचं नुकसान करून घेण्यात काय अर्थ? पालकांचं प्रबोधन करणं, इंग्रजी शाळांना कोणत्याही सवलती न देणं आणि भारतीय भाषा माध्यम असलेल्या शाळांना शक्य तेवढी मदत करून त्यांचा दर्जा उंचावणं गरजेचं आहे. इंग्रजी माध्यमाच्या शाळांप्रमाणेच मराठी माध्यमातसुद्धा अनेक विद्यार्थ्यांची घरची भाषा मराठी किंवा प्रमाण मराठी नसते. म्हणूनच नवीन धोरणात माध्यमभाषेबरोबरच विद्यार्थ्यांच्या घरात बोलल्या जाणाऱ्या भाषेचाही वापर शिकवताना करावा, असं अतिशय स्पष्ट शब्दांत नमूद केलं आहे.धोरणात त्रिभाषा सूत्र मान्य केलं असलं, तरी कोणतीही भाषा लादली जाणार नाही, निःसंदिग्ध ग्वाही दिलेली आहे. कोणत्या भाषा निवडायच्या याचा निर्णय राज्य सरकारांवर आणि विद्यार्थ्यांवर सोपवलेला आहे. तीनपैकी दोन भाषा भारतात बोलल्या जाणाऱ्या असतील. महाराष्ट्रात त्रिभाषा सूत्राची अंमलबजावणी कित्येक दशकांपासून सुरू आहे. महाराष्ट्राचं भाषाविषयक धोरण इतर कोणत्याही राज्याच्या तुलनेत खूपच लवचिक आहे. तरीही विद्यार्थ्यांना इंग्रजी, मराठी आणि हिंदी या तीन भाषा कोणत्या ना कोणत्या स्वरूपात शिकाव्याच लागतात. बदललेल्या परिस्थितीत (पालकांची मागणी लक्षात घेऊन) महाराष्ट्रातलं हे चित्र मोठ्या प्रमाणावर बदलण्याची दाट शक्यता आहे.मसुद्यात बहुभाषिकत्वावर खूपच भर दिलेला आहे. भारतात इंग्रजी येणाऱ्या सुमारे १५ टक्के व्यक्तींचा आर्थिक आणि सामाजिक स्तर सर्वसाधारणपणे इतरांपेक्षा वरचा आहे. त्यामुळे आपल्या मुलांनाही चांगलं इंग्रजी यावं असं प्रत्येकालाच वाटणं साहजिकच आहे. त्यासाठी सर्वच शाळांमध्ये सुरवातीपासूनच चांगलं इंग्रजी शिकण्याची सोय हवी. जर्मन, फ्रेंच, जपानी अशा भाषांपेक्षा इंग्रजीत प्रकाशित झालेल्या विज्ञानाच्या क्षेत्रातल्या संशोधनाला लगेच व्यापक प्रसिद्धी मिळते. या पार्श्वभूमीवर इयत्ता सहावीपासून विज्ञान आणि गणित मातृभाषा आणि इंग्रजी अशा दोन भाषांमधून शिकता येण्याची सोय उपलब्ध करून देण्याची शिफारस केली आहे. असं झालं तर विद्यार्थी नववीपर्यंत या दोन्ही भाषांत सहजपणे संकल्पना मांडू शकतील. शिक्षकांना या पद्धतीचं प्रशिक्षणही दिलं जाईल. महाराष्ट्रात ही पद्धत 'सेमी-इंग्रजी' या नावानं अनेक वर्षांपासून सुरू आहे. महाराष्ट्रात या वर्षीच्या दहावीच्या परीक्षेत सव्वाचार लाखांपेक्षाही अधिक विद्यार्थ्यांनी हा पर्याय स्वीकारला होता. दरवर्षी या संख्येत वेगानं वाढ होत आहे. ही पद्धत न स्वीकारल्यामुळे तमिळ, मल्याळम आणि तेलगू या भाषांची माध्यमभाषा म्हणून परिस्थिती अतिशय दयनीय आहे. माध्यमभाषा म्हणून मराठीचा पुरस्कार करणाऱ्या संस्था आणि व्यक्ती यांनी हे लक्षात घेण्याची गरज आहे. विद्यार्थ्यांचं मूल्यमापन आणि परीक्षायापुढे शिक्षकांनी केलेल्या आकारिक मूल्यमापनाच्या आधारे अध्ययन प्रक्रियेत गरजेनुसार बदल करण्यावर भर राहील. 'दहावी आणि बारावीच्या परीक्षा बंद होतील, ही परीक्षा घेणारी मंडळं बरखास्त केली जातील,' अशा अफवांचं गेल्या काही दिवसांत पेवच फुटलं होतं. खरं तर प्रत्येक सत्राच्या अखेरीस एक याप्रमाणं मंडळामार्फत आयोजित होणाऱ्या आठ परीक्षांना विद्यार्थी बसू शकतील. परीक्षेसाठी कोणती मोड्यूल निवडायची याचं स्वातंत्र्य विद्यार्थ्यांना असेल.

पाठांतराला फाटा देणाऱ्या या परीक्षांत उपयोजन आणि तर्कशुद्ध विचार यांच्यावर भर असेल. शाळा-समूह योजनाछोट्या शाळांचं एकाकीपण दूर व्हावं, परिसरातल्या शाळांमध्ये सहकार्याचं वातावरण वाढावं, त्यांच्यात भौतिक आणि शैक्षणिक सुविधा आणि तज्ज्ञता यांची देवाण-घेवाण व्हावी, यासाठी कोठारी आयोगानं शिफारस केलेली शाळा-समूह योजना पुनरुज्जीवित करण्यात येईल. एक माध्यमिक शाळा आणि तिच्या परिसरातल्या इतर सर्व प्राथमिक शाळा यांचा एक शाळा-समूह बनेल. परिसरातल्या स्वयंस्फूर्तीनं सहभागी होऊ इच्छिणारे शिक्षित पालक, विविध व्यवसायांत असलेले नागरिक, माध्यमिक शाळांत आणि महाविद्यालयांत शिकणारे विद्यार्थी, सेवानिवृत्त शिक्षक, शिक्षित युवक हे मागं पडणाऱ्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन आणि विद्यार्थ्यांची उपस्थिती याबद्दल, तर शेतकरी, उद्योजक, व्यावसायिक, कारागीर हे आपापल्या क्षेत्राशी संबधित मार्गदर्शन अशा जबाबदाऱ्या स्वीकारू शकतील. शाळेतले हुशार विद्यार्थी इतर विद्यार्थ्यांसाठी ट्युटर म्हणून काम करू शकतील. पूर्वीच्या राष्ट्रीय साक्षरता मिशनसारखाच हा कार्यक्रमही मिशन मोडमध्ये राबवावा लागेल. मध्यंतरी छोट्या शाळांचं एकाकीपण आणि आणि त्यांना भौतिक सुविधा पुरवण्यात येणाऱ्या अडचणी यावर मार्ग म्हणून तत्कालीन सरकारनं छोट्या शाळाच बंद करण्याचा निर्णय घेतला होता! शिक्षण हक्क कायद्याच्या विरोधात असणारी ही तुघलकी कल्पना हे धोरण तयार करताना बाजूला ठेवली आहे, याचं स्वागतच करायला पाहिजे.अंमलबजावणीखुल्या शिक्षणव्यवस्थेचा पुरस्कार करणारं हे धोरण खूपच महत्त्वाकांक्षी आहे. परंतु, कोणत्याही समाजाची उंची त्याच्या आकांक्षांपेक्षा जास्त असू शकत नाही. कोणतंही धोरण त्याच्या अंमलबजावणीइतकंच चांगलं असतं. धोरणाची प्रभावी अंमलबजावणी तीव्र राजकीय इच्छाशक्ती, वाढीव आर्थिक तरतूद, सक्षम मनुष्यबळ, अंमलबजावणी करणाऱ्या यंत्रणांमधला समन्वय आणि उत्कृष्ट टीम स्पिरीट यांवरच अवलंबून राहील. या धोरणाच्या अंमलबजावणीसाठी कृतिकार्यक्रम तयार करताना राज्यांना विश्वासात घ्यायला हवं. प्रत्येक राज्याची पार्श्वभूमी भौगोलिक, सामाजिक, सामाजिक, आर्थिक, औद्योगिक अशा सर्व अंगांनी वेगवेगळी असते. या विविधतेचं प्रतिबिंब या कृतिकार्यक्रमात पडलेलं दिसायला हवं. काही क्षेत्रांत नवीन कायदे तयार करून अंमलात आणावे लागतील. परंतु, सर्वच गोष्टी कायदे करून साध्य होत नाहीत, हे विसरून चालणार नाही. शिक्षण हक्क कायद्याच्या अंमलबजावणीचा अनुभव आपण घेतच आहोत. नवीन योजनांच्या अंमलबजावणीसाठी आणि जुनी व्यवस्था बदलण्यासाठी पैसा लागेलच. केंद्र सरकारला त्यातला मोठा वाट उचलावा लागेल. परंतु, राज्यांना आर्थिक मदत करताना त्यांच्यावर जाचक अटी लादल्या जाणार नाहीत, राज्यांच्या स्वायत्ततेवर अतिक्रमण होणार नाही, याबाबतीत केंद्रानं कायम संवेदनशील रहायला पाहिजे. नवीन शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीबाबत अनेक सूचना, लेख येत असतात आणि येत राहतील. ते कोणीही लिहिले असले, तरी त्याकडे पक्षीय दृष्टिकोनातून न पाहता, ते गुणवत्तेच्या आधारेच तपासायला पाहिजेत. राजकीय पक्षांनीसुद्धा नवीन धोरणाची एक तर पूर्णपणे बाजूच घ्यायची किंवा टीकेची झोड उठवायची असं न करता आपण मुलांचं भवितव्य घडवणाऱ्या दस्तावेजाबद्दल लिहीत किंवा बोलत आहोत, हे कायम लक्षात ठेवायला पाहिजे. ज्यांना शक्य आहे, त्यांनी या धोरणाच्या अंमलबजावणीत सहभागसुद्धा घेतला पाहिजे. अंमलबजावणीत महत्त्वाची भूमिका असलेल्या विविध स्तरांवरील अधिकाऱ्यांपासून शिक्षकांपर्यंत सर्वांनी हे धोरण समजून घेऊन अंमलबजावणी केली नाही, तर 'धोरणे आखण्यात जगात सर्वोत्कृष्ट आणि अंमलबजावणीत तेवढेच निकृष्ट,' ही आपली प्रतिमा कायम राहील. तसं यावेळी घडू नये, यासाठी आपण सर्वांनीच प्रयत्नशील राहायला पाहिजे.



प्रा.व्ही.पी.दिक्षित
शिरपूर जि.धुळे
९४२१३६६२७६

# नवीन शैक्षणिक धोरण २०२०

२१ जुलै २०२०- नवीन शैक्षणिक धोरणे २०२०. चौतीस वर्षानंतर भारतातील शैक्षणिक बदल होणारा हा मैलाचा दगड ठरणार आहे.

आयोगाचे अध्यक्ष डॉ.के. कस्तुरीरंगन यांच्या नेतृत्वाखाली स्थापन झालेल्या ११ सदस्यीय मंडळाने या धोरणाचा ढाचा तयार करून त्यास नुकतीच केंद्रीय मंत्रीमंडळाने मंजूरी दिली आहे.

❊ ५+३+३+४ अशी शिक्षणाची नवीन रचना. पूर्व प्राथमिक शिक्षणही कायद्याच्या कक्षेत. या रचनेतील पहिली पाच वर्षे म्हणजे पूर्व प्राथमिकची तीन वर्षे (तीन ते पाच वयोगट) इयत्ता पहिली व दुसरी (सहा-सात वर्षे वयोगट) त्यानंतरची तीन वर्षे म्हणजे तिसरी, चौथी, पाचवी अशी असतील. या टप्प्यापर्यंत शिक्षणाचे माध्यम मातृभाषा असेल. सहावी ते आठवी हा तिसरा टप्पा. या टप्प्यावर विविध विषयांची ओळख करून देण्यात येणार नववी ते बारावीचा शेवटचा चौथा टप्पा.

❊ पहिली ते आठवी पर्यंत परिक्षा होतील. परिक्षांच्या नियोजनासंदर्भात राष्ट्रीय मुल्यमापन केंद्र ही संस्था मुल्यमापनाचे निकष ठरवणार ही रचना २०२२-२३ पावेतो टप्प्याने अमलात येणार.

❊ दहावी बारावीच्या परिक्षा कायम असून वर्षभरात दोन परीक्षा किंवा प्रकल्पाच्या माध्यमातून मूल्यांकनाच्या रचनेत बदल होणार आहे.

❊ उच्च शिक्षण संस्थांमधील प्रवेशासाठी सर्व अभ्यासक्रमांसाठी एकच परिक्षा असेल. नॅशनल टेस्टींग एजन्सीच्या माध्यमातून परिक्षा घेण्यात येईल.

❊ विविध विषयांच्या स्पर्धा परिक्षांचे आयोजन केले जाईल. मात्र त्या ऐच्छिक असतील.

❊ शिक्षक होण्यासाठी शिक्षणशास्त्रातील पदवी (बी.एड.) अभ्यासक्रम पूर्ण केलेला आवश्यक. गुणवान विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीची सुविधा. बी.एड.अभ्यासक्रम बारावीनंतर चार वर्षासाठी.

❊ आंतरविद्याशाखीय शिक्षण-एखाद्या विद्यार्थ्याला ज्या शाखेतील शिक्षण यायचे आहे त्यातील प्रमुख विषयाबरोबर इतर विद्या शाखांतील विषयांचेही शिक्षण घेता येईल.

❊ विद्यापीठांचे वर्गीकरण संशोधन विद्यापीठे, अध्ययन अध्यापन विद्यापीठे स्वायत्त शिक्षणसंस्था असे असेल.

❊ उच्च शिक्षण नियमणासाठी भारतीय उच्चशिक्षण आयोग स्थापन होऊन वैद्यकीय शिक्षण व विधी शिक्षण वगळता सर्व व्यवसायीक विद्याशाखांचे नियमन ही संस्था भरेल. या आयोगातील राष्ट्रीय उच्च शिक्षण नियामक परिषद, जनरल एज्युकेशन काऊंसिल, उच्च शिक्षण अनुदान परिषद राष्ट्रीय मुल्यांकन व श्रेयांकन परिषद हे चार घटक असतील.

❊ विविध विद्याशाखांमधील संशोधनास आर्थिक मदत करणे, अनुदान देणे, संशोधकांना प्रोत्साहन देणे यासाठी राष्ट्रीय संशोधन न्यासची स्थापना होणार आहे.

❊ या धोरणाच्या अंमलबजावणी २०२१ पासून होऊन २०२३ मध्ये पहिली दहावीची आणि २०२५ मध्ये पहिली बाराची परिक्षा नवीन अभ्यासक्रमानुसार होईल.

❊२०२३ पावेतो 'शालेय संकुल' ही संकल्पना अमलात येऊन एकाच परिसरातील १० ते २० सरकारी शाळांचा गट करण्यात येणार शालेय संकुल व्यवस्थापन समिती अस्तित्वात येईल.

❊ राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात शिक्षक नियुक्ती पारदर्शीपणे होणार असून कंत्राटी शिक्षक,

शिक्षणसेवक पद्धत बंद करण्यात येणार आहे.

✼ शालेय पोषण आहार सोबत नाष्टा.

शिक्षण धोरण राबवण्यासाठी २०२१ व २०२३ हे वर्ष महत्वाचा टप्पा असेल.

✼ कमी प्रतिनिधीत्व असणाऱ्या गटातील किंवा वंचित मुलांच्या बाबतीत देशभरातून वंचित प्रदेशांमध्ये विशेष झोन्स उभारण्यात येतील.

✼ सध्याचा २ वर्षांचा बी.एड. अभ्यासक्रम सन २०२३ पर्यंत कायम राहिल.

✼ सेवांतर्गत सातत्यपूर्ण ऑनलाईन प्रशिक्षण दर्जेदार कामासाठी वेतनवाढ व बढतीच्या संधी असणार.

✼ २०३० पावेतो सर्व अंगणवाड्या शाळा समुहांशी जोडणार.

✼ प्राथमिकसाठी मुलांची पायाभूत साक्षरता आणि गणिती क्षमतांवर कामाचे प्राधान्य. २०२५ पर्यंत इयत्ता तिसरी पर्यंतच्या सर्व मुलांनी या क्षमता प्राप्त करण्याचे उद्दिष्ट.

✼ स्थानिक बोलीभाषा जाण असणाऱ्या शिक्षकांची नेमणूक.


✼ शारिरीक व मानसिक आरोग्याची नियमीत तपासणी करून आरोग्य कार्ड योजना राबवणार.

✼ माध्यमिक स्तरावर नववी ते बारावीमध्ये वेगळे विषय निवडण्याचे व दहावीनंतर व्यवसायिक किंवा इतर कोर्सेस करून नंतर पुन्हा अकरावीत परत येण्याचे स्वातंत्र्य.

✼ सहावी पासून परिक्षा नसलेले इतर भारतीय भाषांचे छोटे फन कोर्सेस आणि व्यवसायिक क्षेत्रांचा प्रत्यक्ष अनुभवासाठी सुतारकाम, बागकाम, प्लंम्बींग आदी कोर्सेस असणार.

**(विरेंद्र पी.दिक्षीत हे आर.सी.पटेल माध्य व उच्च माध्य.विद्यालय होळनांथे ता.शिरपूर जि.धुळे येथे प्राचार्य म्हणून कार्यरत)**

## माझी कविता



### श्रावण

आला श्रावण श्रावण
रान वनही फुलले
अशी नाजूक लतिका
झाडांवर मस्त झुले

नदी नाल्यातून कसे
झुळझुळु पाणी वाही
दरी डोंगर कपारी
हिरवळ दाटून जायी

लुस लुशीत गवत
कसं डोली वाऱ्यावर
किलबिल पाखरांची
चाली झाडं फांद्यावर

निसर्गाचे उपकार
दिलं माणसाले दान
होई मनही प्रसन्न
अशी सौंदर्याची खान

**रामकृष्ण पांडुरंग पाटील**
विखरण,ता.जि.नंदुरबार
९४०८८८५७७५


विनोबा विचार..



नीला आपटे
विनोबा आश्रम,गागोदे
९४०५९२४२२७.

# शिक्षणाचे माध्यम...

विनोबांनाही उच्च शिक्षणामध्ये शास्त्रीय संशोधन क्षेत्रामध्ये इंग्रजीचे ज्ञान महत्व मान्य होते परंतु त्यांचा विचार अगदी सुस्पष्ट होता. त्यांनी म्हटले आहे की, विज्ञानाचा प्रयोग पहिल्यांदा सिद्ध होतो आणि नंतर त्याची परिभाषा बनते. प्रयोग करण्याची कृती ही जास्त महत्वाची आहे कारण मुलांना विज्ञान त्यातूनच समजणार आहे. आपण परिभाषा कोणती असावी यामध्येच अडकून पडलो आहोत.



शिक्षणाचे माध्यम मातृभाषा असावे. परिसराची भाषा असावे की जागतिक ज्ञानाची भाषा असलेली इंग्रजी भाषा, हा गेली अनेक वर्षे शिक्षण क्षेत्रात चर्चिला जाणारा विषय आहे. सर्व बाजूंचे समर्थक आपला मुद्दा अतिशय समर्थपणे मांडत असतात. मानस शास्त्रज्ञ व जगभरातील शिक्षणतज्ञ मुलांचे प्राथमिक शिक्षण त्यांना परिचित असणाऱ्या भाषेतूनच व्हावे असेच शास्त्रोक्त विचार म्हणून सांगतात. विनोबांनीही 'मातृमुखेन शिक्षणम्' असे म्हटले आहे. शिक्षणाचे प्राथमिक धडे मूल आईकडूनच घेते त्यामुळे आईच्या भाषेतच. म्हणजे मातृभाषेतूनच घेते आणि तेव्हाच ते प्रभावी ठरू शकते हा विचार ते मांडतात. विनोबा. शिक्षण हे दैनंदिन जीवनाशी जोडले गेले पाहिजे किंबहुना जीवन हेच शिक्षण आहे असे मानणारे होते. त्यामुळेही दैनंदिन जीवनामध्ये वापरली जाणारी भाषा हीच शिक्षणाचे माध्यम म्हणून योग्य आहे असे ते मानत होते. मातृभाषेतच शिक्षण दिले जावे हे सांगताना विनोबा म्हणतात की, ''गाढवाच्या पिल्लाला विचारले की तुला गाढवाच्या भाषेत ज्ञान द्यावे की सिंहाच्या भाषेत तर तो असेच म्हणेल की सिंहाची भाषा कितीही चांगली असो मला तर गाढवाची भाषा समजेल. सिंहाची नाही. मनुष्याचे हृदय मातृभाषाच ग्रहण करू शकते. तेव्हा शिक्षण तिच्याच द्वारा दिले जावे याबाबत शंका असूच नये.'' परंतु आजच्या जगामध्ये शिक्षणाच्या माध्यमावर जो वाद होतो त्याचे उत्तरही वेगळ्या अंगाने विनोबांच्या शिक्षण विचारात आपल्याला मिळते असे मला स्वत:ला वाटते.

आजपर्यंत मी देखील मातृभाषेतून आणि परिसराच्या भाषेतूनच शिक्षण व्हावे याच विचारांची होते आणि आहे. परंतु इंग्रजी भाषेचे महत्त्व आता आपल्याला नाकारता येणार नाही. विनोबांनाही उच्च शिक्षणामध्ये इंग्रजीचे ज्ञान, महत्त्व मान्य होते परंतु त्यांचा विचार अगदी सुस्पष्ट होता. त्यांनी म्हटले आहे की, विज्ञानाचा प्रयोग पहिल्यांदा सिद्ध होतो आणि नंतर त्याची परिभाषा बनते. प्रयोग करण्याची कृती महत्वाची आहे. कारण मुलांना विज्ञान त्यातूनच समजणार आहे. आपण परिभाषा कोणती असावी यामध्येच अडकून पडलो आहोत. यासाठी त्यांनी दिलेले उदाहरणाची खुप बोलके आहे. ते म्हणतात की

रेडीओचा शोध लावणे आणि त्याचा उपयोग करणे या वेगवेगळ्या गोष्टी आहेत. तरी त्याचा उपयोग जनसामान्यांना व्हायचा असेल तर, ते विज्ञान आपल्याला प्रादेशिक भाषेतूनच लोकांपर्यंत न्यायला हवे. विनोबांच्या काळात इंग्रजी भाषेबद्दल असलेला समज कसा चुकीचा आहे हे सांगताना विनोबा गमतीने म्हणाले होते की, 'इंग्रजी भाषेमुळे उत्पादकता वाढत असेल तर बैलांनाही इंग्रजी शिकवायला हवे.'

आज सर्वच स्तरावरील पालकांचा इंग्रजी माध्यामाकडे प्रचंड ओढा आहे. आपल्याला तो थांबवता येणार नाही असे जाणवत आहे. जीवनाच्या सर्वत्र क्षेत्रांमध्ये इंग्रजी भाषा सर्वच प्रादेशिक भाषांवर हानी होत आहे. असे आपण पाहतो. अपरिचित भाषेतून शिक्षण घेण्याच्या आग्रहामुळे विविध विषयातील मुलभूत संकल्पना समजून घेणे अवघड बनते आहे आणि त्यान समजून घेता पुढच्या इयत्तेत गेल्यामुळे एकूणच शैक्षणिक गुणवत्ता कशी खालावू शकते हे तत्वतः कोणाही सूज्ञ माणसाला कळू शकते. अनेक जण मातृभाषेतून किंवा परिसर भाषेतून शिक्षण देणे किती महत्त्वाचे आहे. हे पटवून देण्याचा आटोकाट प्रयत्न वर्षानुवर्षे करत आहेत. पण तरीसुद्धा इंग्रजी भाषेचा व इंग्रजी माध्यमाना समाजजीवनावरील प्रभाव कमी झालेला दिसत नाही. किंबहुना दिवसेंदिवस वाढतोच आहे. अनेक वेळा असाही विरोधाभास दिसतो की, मातृभाषा आणि प्रादेशिक भाषेचे शिक्षणातील महत्व काय आहे याबद्दलची चर्चासत्रे देखील इंग्रजी भाषेत चालतात व बिगर इंग्रजी माणसाला तेथे प्रादेशिक भाषेतून बोलण्याचा संकोच वाटू लागतो! अशा परिस्थितीमध्ये इंग्रजी भाषेचा इतका प्रभाव समाजजीवनावर का आहे हे समजून घेऊन मातृभाषेतून शिक्षण देण्याचा आपला आग्रह सोडावा का असाही संभ्रम मनात निर्माण होतो.

विनोबाचे शिक्षणविषयक विचार वाचत असताना माध्यम म्हणून दोन भाषांमध्ये असलेला हा वाद मिटेल अशा पद्धतीची कारणमीमांसा विनोबांच्या शिक्षण विचारातच मला दिसली. विनोबांनी आधीच म्हटले आहे की शिकवणे ही कृती मुळात अस्तित्वातच नाही. भारतीय भाषांमध्ये शिकविणे या अर्थाचे मूळ क्रियापद देखील नाही. फक्त 'शिकणे' या प्रक्रियेसाठी मूळ क्रियापद आहे. त्यामुळे आपण जेव्हा शिक्षणाचे माध्यम असे म्हणतो तेव्हा खरंतर 'मिडीयम ऑफ इन्स्ट्रक्शन' किंवा 'शिकवण्याच्या' भाषेचा विचार करत असतो. विनोबांच्या म्हणण्यानुसार जर शिकवण्याची क्रिया ही मुळात नसेलच शिकविण्याच्या माध्यमाचा प्रश्नच येत नाही. शिकण्याची क्रिया असते तिथे माध्यम कोणते असावे हे त्या व्यक्तीच्या भाषेवर किंवा अन्य क्षमतांवर अवलंबून असते. विनोबा म्हणतात की, शिकण्याचे माध्यम प्रत्यक्ष केलेली कृती असते. त्यामुळे रूढार्थाने ज्या गोष्टीला आपण शिक्षणाचे माध्यम असे आज समजतो. ते माध्यम केवळ शिकविण्याचे माध्यमाचा प्रश्न बऱ्याच अंशी कमी करता येईल.

शिकणे जर पूर्णपणे कृतीयुक्त, हाताच्या कामाला-कौशल्यांना प्रोसात्हन देणारे आणि अन्य उपक्रम व कृतीने परिपूर्ण असेल तर या कृतींच्या माध्यमातूनच मुले शिकतील. अवघड संकल्पना समजून घेतील. कारण संकल्पना अपरिचित भाषेतून शिकविणे हा भाग त्यात नसेलच. मुले काही कृती करतील आणि स्वतःच त्या संकल्पना समजून घेतील. आजच्या शिक्षण व्यवस्थेत जो ज्ञानरचनावाद शब्द आपण सारखा ऐकती त्यामध्येही असे कृतीतून शिक्षणच अपेक्षित आहे. थोडक्यात काय, अध्ययन-अध्यापन व शिक्षणाची पद्धती कृतीयुक्त असेल तर रूढार्थाने शिक्षणाचे अथवा शिकविण्याचे माध्यम काय आहे याने फारसा फरक पडणार नाही. त्यामुळे आता यापुढे 'शिकविण्याचे' माध्यम काय असावे या वादात न पडता 'शिकण्याचे' माध्यम कृती कसे बनवता येईल व संपूर्ण शिक्षण प्रक्रिया उत्पादक काम, हस्तकौशल्य व सहभागी कृतीशीच जोडलेली कशी ठेवता येईल यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे.

आनंदाचं झाड...



युवराज माने
सेलू जि.परभणी
७५१७४७८५७०

# कुठल्या बिया पेरायच्या ?

मुलांचं आयुष्य सुंदर झालं पाहिजे. प्रत्येकाला त्याच्या गतीनुसार शिक्षण मिळायला पाहिजे. मुलांच्या भाव-भावना,मनातील कल्पनांना मोकळं अवकाश मिळालं पाहिजे.प्रत्येक मुलाला इथं अभिव्यक्त होता आले पाहिजे.प्रत्येक गुरुजींनं मुलांची आई व्हायला पाहिजे...अशी प्रामाणिक उर्मी असेल तर आपल्याला दिलेला विध्यार्थीरुपी 'कॅनव्हॉस' आपल्या उपायांच्या रंगांनी, कल्पनांच्या तरंगांनी भरू शकतो आपण...! आपल्या देहाला मनाचा साक्षात्कार देणारा क्षण शाळेत येतो. याची प्रचिती मागील काळात मला सातत्याने येत गेली आहे.

कुठल्याही नियमात सातत्य आणि ध्यास असला की त्याला समाधानाची फुले येतातच.नियम तो साधा असो; छोटा असो; पण त्यात धरसोड असून उपयोग नाही.गावकऱ्यांनी एकत्र येऊन गावातील शाळा कशा समृद्ध केल्या याचा प्रत्यक्ष अनुभव घेऊन परत आल्यानंतर पालकांनी इतर गावकऱ्यांना शाळेप्रती एकत्रित होण्याचे आवाहन सुरू केले.धडपडीचं बीज उत्तम प्रकारे रुजू लागलं. गावात शिक्षणाविषयीची चर्चा सुरू झाली.पाहून आलेल्या शाळांविषयी





चौकाचौकात गप्पा रंगू लागल्या.पालकांची पावलं शाळेच्या दिशेने वळू लागली.ही एक आनंदाची बाब. पण यात सातत्य ठेवणं खूप गरजेचं होतं.कुठलाही चांगला विचार मनात आल्यास त्याची पूर्तता तात्काळ करावी असं म्हणतात ते अगदी खर आहे... माऊली राठोड व इतर तरुण मंडळींनी हे प्रेरणेचं व धडपडीचं बीज पेरण्याचं काम चालू ठेवलं. सकाळ संध्याकाळ जसं जमेल तसं शिक्षणाचे महत्त्व माऊली राठोड आपल्या गावकरी बांधवांना समजून सांगू लागले...

इकडे शाळेत प्रत्यक्ष काम करताना मुलांची बेशिस्त व मुलांची शिवराळ भाषा आम्हाला आव्हान देणारी होती. आम्ही सर्व शिक्षक बांधव मुलांच्या शिस्तीवर व त्यांच्या दैनंदिन शिक्षणावर चिंतनात्मक कार्य करू लागलो. पालकांची शाळेविषयीची अनास्था किंबहुना शिक्षणाविषयीचे अज्ञान हे प्रमुख अडथळे आमच्या समोर होते. त्यामुळे शाळेत येणारी मुलेही शरीरानं शाळेत;पण मनानं घरी, शिवारात गुराढोरांच्या मागे असायची.अशा मुलांना शाळेत टिकून ठेवणं हे महत्त्वाचं काम. शाळेतील पटसंख्या व दररोजच्या पटावरील संख्येत मोठी तफावत असायची. मुलं शाळेत न जाता घरी इतरत्र भटकत राहतात तरी त्याचं पालकांना काहीच गांभीर्य नसावं ही बाब मनाला सतत खटकत राहायची. बालपणात आपणही स्वत:अशाच परिस्थितीतून शिकलो. शिक्षणाने जीवनात कसा बदल

होतो.याची जाणीव असल्यामुळे शाळेतील या मुलांविषयी व गावातील पालकांविषयी मन अगदी गलबलून जायचं.ही परिस्थिती बदलली पाहिजे.ह्या लेकरांना शिक्षणाची गोडी लागली पाहिजे. असं स्वतःचं अंतर्मन मला जाग ठेवायचं. यातून माऊली राठोड यांच्यासोबत सतत चिंतन व्हायचं .मुलांना शाळेत रमून ठेवण्यासाठी सतत डोक्यात विचार सुरु झाले.मागील शाळेतील उपक्रमातून मुलांना शिक्षणाविषयी लागलेली गोडी लक्षात घेऊन एक एका उपक्रमाची सुरुवात केली.'मुळाशी पाणी जाताचं ज्याप्रमाणे रोपं तरारत जाताना जाणवत जाते. नीट जर पाहिले तर पाणी असं शिराशिरांतून वर सरकत पानांना तजेला आलेला जाणवतो. तसंच शाळेतील शिक्षकांचे प्रयोग मुलांच्या मनाला वेगळी ऊर्जा देतात.'

छोट्या छोट्या प्रसंगातून उपक्रमांना सुरुवात झाली.शाळेतील मुलांना एकत्रित करून सामुहिक स्वरूपाचे उपक्रम प्रथमता राबवणे गरजेचे वाटू लागलं. यातूनच 'बालसभेला' सुरुवात झाली. प्रत्येक मूल कलावंत म्हणून जन्माला येते. बऱ्याचदा हा कलावंत अनेक प्रसंगातून खोडला जातो. हा कलावंत जिवंत राहावा .मुलांच्या कल्पनांना धुमारे फुटावेत. सर्वात महत्त्वाचं म्हणजे मुलांना शाळेविषयी आवड निर्माण व्हावी. मुलांनी शाळेत त्यांच्या मनासारखं काय असावं हे स्वतःहून सांगावं. आपल्यालाही शाळेत बोलू दिल्या जातंय, आपल्यालाही आपल्या मनातल्या गोष्टी आपल्या मित्रांना सांगता येतात याची जाणीव व्हावी यासाठी मुलांना बाल सभेत स्वातंत्र्य देऊ लागलो. शाळेतील पहिलीच बालसभा अतिशय मनोरंजक व कलात्मक झाली. मुलांना स्वतःच्याच भाषेत बोलण्याची मुभा दिली. मुलांच्या उत्सुकतेला दिशा देण्याचे काम आम्ही करू लागलो. बालसभेचे अध्यक्ष ,प्रमुख पाहुणा व कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सर्व मुलेच करतात. हे मुलांसाठी खूपच कुतूहलाचं व शाळेविषयी गोडी निर्माण करणारं ठरलं. महिन्यातून दोन वेळा बाल सभांचे आयोजन करण्यात येऊ लागलं. बालसभाही मुलांच्या चर्चेचा विषय ठरला. बालसभेची मुलं उत्सुकतेने वाट पाहू लागले . प्रत्येकजण सहभागी होण्यासाठी प्रयत्न करू लागला. यातूनच मुलांना शाळेविषयी आवड निर्माण होऊ लागली.

इकडे माझ्या वर्गातील मुलांचा माझ्यावरील राग आता हळूहळू कमी होऊ लागला होता. कुठेतरी माझ्याविषयी त्यांच्या मनात प्रेमाची चाहूल सुरू झाली होती. मागील तीन-चार दिवसांपासून अश्विनी शाळेत येत नव्हती. मुलांना अश्विनीविषयी विचारणा केली असता मुलं सांगू लागले, गुरुजी, अश्विनी खूप आजारी आहे .तिला खूप ताप येत आहे. हे ऐकून मन अगदी अस्वस्थ झालं अश्विनी एक नटखट, हसरं व तेवढच खोडकर लेकरू! सर्वांसोबत कशावरून ना कशावरून तरी भांडणारी! पण लगेच विसरून लागायची. निसर्गाने 'विसरणं' ही एक माणसाला चांगली देणगी दिली आहे म्हणून चांगलं आहे. मुलांना रागावलं, शिक्षा केली तरी ती लगेच विसरून जातात. अश्विनी, कधी शाळेला दांडी न मारणारी मुलगी.आमच्या सर्वांची आवडती चिमुरडी . गेल्या चार-पाच दिवसापासून शाळेत आली नाही म्हणून आम्हा सर्वांना काहीतरी विसरल्या विसरल्या सारखं वाटत होतं. चला ,आपण तिला भेटायला जाऊ या. असे मुलांना म्हणताचं सर्व मुलं माझ्याकडे आश्चर्याने पाहू लागले.कारण यापूर्वी कधीही मुलं असं कुण्या आजारी मुलाला शाळेतून भेटायला गेले नव्हते.निकिता व काजलला शाळेतील फुलांपासून एक गुच्छ बनवायला सांगितला. दोघींनी सुंदर गुच्छ बनवून आणला चला,आपण जाऊ या. असे म्हणताचं सर्व मुलं अश्विनीच्या घराच्या दिशेने निघाले. रस्त्यात असलेल्या दुकानातून मी अश्विनीसाठी बिस्किट विकत घेतले. मुलांना हे सर्व नवल होतं. सोबतच्या काही मुलींनीही अश्विनीसाठी खाऊ घेतला. हे पाहून मनाला खूप समाधान लाभलं. अश्विनीच्या घराजवळ पोहोचताच तिच्या घरचा खंड्या आमच्या स्वागतासाठी तयारच होता. मोठयाने भुंकून त्यांना आमचं स्वागत केलं. अश्विनी बाहेर

खाटेवर झोपली होती.आमच्या सर्वांचा आवाज ऐकून अश्विनी जागी झाली. व ताडकन उठून बसली.आम्हा सर्वांना पाहून अश्विनीच्या आईला खूप आश्चर्य वाटलं. मुलांनी बनवलेला फुलांचा गुच्छ व आणलेला खाऊ अश्विनीला देण्यात आला. सर्वजण अश्विनीला बोलू लागले . तब्येतीविषयी चर्चा करू लागलें.चार-पाच दिवसातील गमतीजमती सांगू लागले. तुझ्या शिवाय,आम्हाला वर्गात करमत नाही. तू लवकर बरी हो . असं तिच्या मैत्रिणी म्हणू लागल्या. मुलांचा हा संवाद तिच्या आईने ऐकला व त्यांना त्यांचे अश्रू अनावर झाले. आपल्या आजारी लेकीला शाळेचे गुरुजी व तिच्या मैत्रिणी भेटायला आल्या व आपलं लेकरू ताडकन उठून बसलं याचा आनंदही त्यांना झाला. माझी मुलगी किती छान आहे ! इतके सारे मित्र मैत्रिणी तिला भेटायला आल्या व तिला हसवलं याचं त्यांना अप्रूप वाटलं.

मुलांना फक्त एकदा समजून सांगितलं तर मुलं किती छान वागतात.आमच्या भेटीमुळे अश्विनी व तिच्या आईला खूप खूप बरं वाटलं. दुसर्यांना आनंद देणे यापेक्षा दुसरं मोठं कोणते काम असू शकतं! हा पाठ या छोट्या कृतीतून मुलांना मिळाला...आणि यातूनच आमचा 'एक क्षण आपुलकीचा' हा उपक्रम सुरू झाला. आता मुलांना आणि मुलांना भेटायला चला म्हणायची गरज नाही...ते स्वतः आपल्या आजारी पडलेल्या मित्रांची भेट घेतात गुरुजींना घेऊन जातात...यातूनही मुलांना शाळेविषयी किंबहुना आपल्या गुरुजी व मित्रांविषयी आपुलकी निर्माण होऊ लागली...

माऊली राठोड व गावातील तरुण मंडळीशी शाळेच्या वेगवेगळ्या बाबींवर चर्चा घडत होती. एके दिवशी गावकऱ्यांची शाळेत सभा भरली. सभेत शाळेच्या विकासा संदर्भात चर्चा झाली. सभेमध्ये मुलांचा ड्रेस कोड बदलण्यासंदर्भात निर्णय घेण्यात आला. शासनाकडून मिळणारी मदत जेव्हा कधी येईल तेव्हा येईल परंतु यावर्षी आपण आपल्या मुलांना नव्या पद्धतीचा ड्रेस खरेदी करू. सोबतच टाय, बेल्ट ,बूट सॉक्स हेही आपण आपल्या मुलांसाठी खरेदी करू असा ठराव घेण्यात आला.प्रत्येक मुलासाठी एक हजार रुपये वर्गणी करण्याचं ठरलं. सर्व साहित्य खरेदी करून उरलेली रक्कम पालकांना परत करायचं असंही ठरविण्यात आलं. ठरल्याप्रमाणे काही पालकांनी सभेतच पैसे द्यायला सुरुवात केली. पण ही संख्या खूप कमी होती. मग घरोघरी जाऊन ही रक्कम जमा करण्याचा निर्णय घेण्यात आला. हे सर्व नवं आणि धोपट मार्गाला सोडून होतं. त्यामुळे माझ्या सहकाऱ्यांनाही हे त्रासदायकच होतं. सकाळ-संध्याकाळ वेळ मिळेल तसं वर्गणी जमा करायला सुरुवात झाली. पण दुर्दैव असं की पावसाने नेमकी दडी मारली. दुष्काळाचं सावट दिसू लागलं. त्यामुळे पालकांकडून पैसे मिळण्यास विलंब लागू लागला. येतील तसे पैसे घ्यायला सुरू होतं. कधीकधी चांगलं काम करताना अघटित घटना घडतात. एके दिवशी सकाळी ८ वाजताच माऊली राठोड यांना गावातून एका सुजाण पालकाचा फोन आला, गावातील काही पालक माने गुरुजींच्या नावाने शाळेच्या समोर आरडाओरड करत आहेत. हा नवीन मास्तर आला आहे. आणि तो नवनवीन काहीतरी काढत आहे. असे म्हणून अर्वाच्च भाषेत गोंधळ घालत आहेत. आणि आज माने गुरुजींना पाहून घेतोच अशी भाषा करत आहेत. तेव्हा तुम्ही लवकर गावात या.. हे ऐकून माऊली राठोड नाराज झाले. आपल्या गावातील मुलांसाठी आपल्या शाळेतील गुरुजी नवनिर्माणाची बीज पेरत आहेत आणि माझे हे गावकरी... पुढील अनुचित प्रकार होऊ नये म्हणून त्यांनी फोनवरूनच गोंधळ घालणाऱ्या पालकांना तंबी दिली की, आपण शाळेत कुठल्याही प्रकारचा गोंधळ घालू नये. माने गुरुजीनाचं काय तर कोणत्याच गुरुजीला चुकीचे शब्द वापरू नये किंवा हातही लावू नये. अन्यथा परिणाम गंभीर होतील. एवढ्यावर न थांबता माऊली राठोड शाळेच्या परिपाठाच्या अगोदर शाळेच्या परिसरात येऊन थांबले.

नेहमीप्रमाणे परिपाठ आला सुरुवात झाली.

घडलेल्या प्रसंगाविषयी मला व माझ्या सहकाऱ्यांना काहीच माहीत नव्हते. शाळेच्या परिसरात मात्र खूप सारे पालक जमा झाले होते. शाळेतील मुलांनी हा सर्व प्रसंग सकाळी ऐकला होता. त्यामुळे मुलं एकमेकांसोबत कुजबूज करत होते. हलक्या आवाजात मुलांचं बोलणं कानावर येत होतं. माझं नाव घेऊनच मुलं काहीतरी चर्चा करत होते. माझ्या वर्गातील काही मुलं घाबरल्यासारखे वाटत होते. परिपाठ झाला आणि मुलं वर्गात बसली. यादरम्यान काही पालक माझ्याकडे आला नाही.माऊली राठोड व शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष अमोल आडे यांनी गावकऱ्यांना एकत्रित बोलवुन शाळेच्या पटांगणात बसण्याची विनंती केली. घडलेल्या नेमक्या प्रसंगावर चर्चा केली. माऊली राठोड गावकऱ्यांशी बोलू लागले, बांधवांनो आपण सर्वजण शेतकरी माणस आहोत, शेती करत करत आपण ऊसतोडीला ही जातो. या कालावधीत आपल्या मुलांचे शैक्षणिक नुकसान होतं. त्यामुळे आपल्या सर्वांची सातत्यानं अधोगती सुरू आहे. काही दिवसांपूर्वी आपण आपल्याच बांधवांनी तयार केलेल्या काही शाळा पाहून आलो. त्याठिकाणी त्यांनी आपल्या मुलांसाठी, भविष्यासाठी शिक्षणाची उत्तम बी पेरले आहे. मातीआडची मेहनत अपार झाली,तर झाडाला फुले येतील! हे आपण शेतकरी म्हणून जाणतोच. बालपण आणि जागृक तारुण्य हे सकारात्मक मेहनतीसाठीच असतं. गावचा जागृत प्रथम नागरिक म्हणून मी उद्याच्या भविष्यासाठी





कल्पतरूंच्या बिया पेरणार आहे. ज्याप्रमाणे आपल्या मुलांसाठी शाळेतील गुरुजी उद्याच्या यशाच्या बिया पेरत आहेत. त्याप्रमाणे आपण सर्वजण उद्याच्या आपल्या मुलांच्या भावी जीवनाच्या उत्तम बिया पेरूया असं मला मनापासून वाटतं वाटतं. सकाळी शाळेच्या आवारात येऊन गोंधळ घालणाऱ्या पालकांच्या मनात माऊली राठोड यांच्या बोलण्याने सकारात्मकतेच्या बिया पेरल्या गेल्या.... त्यांना आपली चूक लक्षात आली. खिन्न मनाने ते आपापल्या घरी परतले... उद्यापासून गुरुजींच्या पाठीशी उभारायचं हा निर्धार करून...

मी मात्र लोकशिक्षक 'प्रवीण दवणे'यांच्या एका प्रसंगात गळून गेलो होतो... ते म्हणतात,

ङ्गभोवतीचं उदास पर्यावरण तडफेने दूर करून नव्या चैतन्याला सामोरे जातो तोच नियमांच्या सातत्याची फळे चाखतो.जीवनाचा फार मोठा कसदार प्रदेश तुमच्यापुढे स्वागतासाठी उभा आहे .आत्ताच 'काही'तरी ठरवायला हवे,नाहीतर- कुठल्या बरं बिया पेरायच्या ? याचाच विचार करीत डुलक्या काढणाऱ्या आळशी माणसासारखी आपली गत व्हायची . वेळीच श्रम करणाऱ्या नियमाने शेती निगा राखणाऱ्या शेतकऱ्याला सुगीचे दिवस येतात. बाकीच्यांना सारे ऋतू कोरडेच..फ

**(युवराज माने हे जि.प.शाळा पारडी ता.सेलू जि.परभणी येथे शिक्षक म्हणून कार्यरत).**

**मराठी मासिक**
**शिक्षणयात्री**
हे मासिक वृत्तपत्र मालक, प्रकाशक,संपादक शैला नंदकिशोर हजारे यांनी मुद्रक सतिष कमलसिंग गिरासे यांच्या मालकीच्या यशवंती ऑफसेट १ ला माळा शिवाजी मार्केट शिरपूर, ता.शिरपूर जि.धुळे ४२५४०५(महाराष्ट्र) येथे छापून ३४, क्रांतीनगर,१ली गल्ली, शिरपूर ता. शिरपूर जि.धुळे ४२५४०५ (महाराष्ट्र). येथे प्रकाशित केले. संपादक -शैला नंदकिशोर हजारे Reg No.

आम्ही आहोतच वेगळे ...



डॉ.नंदा हरम
विज्ञान प्रसारक,पुणे
९३७२९१०३०६

# शवपुष्प

**आई:** महेश, कॉम्प्युटर काय बघतोस एवढं तल्लीन होऊन!

**महेश:** आई, मी तुला सांगणारच होतो सगळं. अग, काल नॅशनल जिओग्राफिक चॅनेलवर एवढी रंजक माहिती मिळाली ना ऐकायला ....तीच आज शोधत होतो मी.

**आई:** मला ही आवडेल ऐकायला, तेवढीच ज्ञानात भर!

**महेश:** काल त्यांनी 'कॉर्प्स फ्लॉवर' म्हणजे शवपुष्प दाखवलं.

**आई :** शवपुष्प ? असलं कसलं रे नाव याचं ?

**महेश :** अगं मीच कॉर्प्स प्लॉवर चे भाषांतर केलं.

**आई:** व्वा! चांगलं केलंस हो भाषांतर! पण एक सांग, या फुलाचा आणि शवाचा काय संबंध ?

**महेश :** या फुलाला सडलेल्या मांसासारखा वास येत असल्यामुळे त्याला हे नाव पडलं.

**आई:**ऐकावे ते नवलच! फुलं खरी ओळखली जातात, त्यांच्या सुवासा मुळे... किंवा काही फुलांना खास सुवास नसतोच. पण अशी दुर्गंधीं!

**महेश:**आई... सुवासाकडे कीटक, फुलपाखरं, पक्षी आकर्षित होतात ना, त्याचप्रमाणे या फुलाच्या वासाकडेही कीटक, माश्या आकर्षित होतात.

**आई:**बाळा.... माहित आहे का तुला, ही फुलं या कीटकांना, पक्ष्यांना आकर्षित का करतात ?

**महेश:** अग, परागीकरणासाठी. हे कीटक, पक्षी जेव्हां फुलातील मधुरस शोषून घेतात, तेव्हा त्या फुलातले परागकण त्यांच्या अंगाला चिकटतात. ते जेव्हा दुसऱ्या फुलाकडे जातात, तेव्हां हे परागकण दुसऱ्या फुलाच्या कुक्षीवर पडतात.

**आई:** मस्त, चांगली माहिती आहे तुला.... महेश बेटा, एक सांग. या फुलांविषयी मी पूर्वी काहीच कसं ऐकलं नाही!

**महेश:**अग, आई! ही फुलं इंडोनेशिया, सुमात्रा येथे आढळतात.

**आई:** एवढं नॅशनल जिओगाफिक्रवर दाखवण्या सारखं काय वैशिष्ट्य आहे या फुलांचं ?

**महेश:** नेमकं बोट ठेवलंस बघ मर्मावर! वनस्पती सृष्टीतील सर्वांत मोठ्या फुलाचा मान या पुष्पाला मिळतो. आत्तापर्यंत आढळलेलं सर्वांत मोठं आहे. फूल ३.६ फूट म्हणजे जवळ-जवळ ४२ इंच व्यासाचं आणि वजन ११ किलो...



आकृती क्र.१ः
रॅफ्लेशिया अरनॉल्डी

(आकृती क्र. १पहा.)

**आई:** बापरे! अगदी महाकायच आहे! आणखी काय वैशिष्ट्य ? त्याचा शोध कोणी लावला ? स ा ं ग ना.

**महेश**: सांगातो, सांगतो. किती अधीर होतेस तू? या वनस्पतीचं नाव आहे, रॅफ्लेसिआ अरनॉल्डी.

**आई**: माणसांच्या नावासारखं वाटतं. ?

**महेश**: तुझा अंदाज बरोबर आहे... अगदी स्मार्ट आहेस हं तू! जगातील सर्वांत मोठं आणि भव्य फूल असल्याचं वर्णन १८१८ मध्ये सर रॅफ्लस यांनी, त्याचा शोध लावताना केलं. त्यांचा सहकारी डॉ. जोसेफ अरनॉल्ड आणि त्यांचं स्वतःचं नाव यावरूनच या फुलाचं नाव प्रचलित झालं.

**आई**:किती छान! त्या शास्त्रज्ञांची नावं अमर झाली.

(आकृती क्र.२, शास्त्रज्ञ)




आकृती क्र.२

**महेश**: आणि हो.... महत्त्वाचं सांगायचं राहिलं, ही एक वैशिष्ट्यपूर्ण परजीवी वनस्पती आहे.

**आई**: म्हणजे काय, महेश?

**महेश**: या वनस्पतीच्या तंतूमय पेशी पूर्णपणे पोशिंदा वनस्पतीच्या आत आढळतात. जिथून अन्नरस आणि पाणी ही वनस्पती मिळवते. या वनस्पतीला पानं, मूळ, खोड काहीही नसतं, फक्त हे प्रचंड फुल येतं.

**आई**: परजीवी वनस्पतींचा आणखी काही प्रकार असतो का?

**महेश**: हो तर! 'बाह्य परजीवी' म्हणजे ही वनस्पती पोशिंदा वनस्पतीच्या बाहेर असते.

**आई**: एखादं उदाहरण सांगतोस का?

**महेश**: अग, सगळ्यांना माहित असलेली अमरवेल, (आकृती क्र.३ पहा)




आकृती क्र ३

झाडाझुडुपांवर पाने नसलेली पिवळसर वेल वाढलेली तु पाहिलेली असेल या अमरवेलीचे कमकुवत खोड सुतासारखे असून पोशिंदा वृक्षावर आच्छादलेले असते.

**आई :** पण त्यांना अन्न पाणी कसं मिळते?

**महेश**:आई, कसा नेमका प्रश्न विचारतेस ग.... या अमरवेलीचं बी जमिनीत रूजल्यावर त्यातून तंतूसारखं खोड बाहेर येतं. त्याला दुसऱ्या वनस्पतीला आधार मिळाला नाही तर ते लगेच मरून जातं. पण आधार मिळताच या खोडाला शोषक मुळे फुटतात. ही शोषक मुळे पोशिंदा झाडांच्या खोडात, फांद्यांत घुसून अन्नरस शोषून घेतात.

**आई**: या वेलीला जमिनीत वाढणारी मुळे नसल्याने 'निर्मुळी' असे म्हणतात, बरोबर?

**महेश**:माझी परीक्षा घेत्येस ना....झालो का पास ?

**आई**:अगदी १००% टक्के! चांगली माहिती संकलित करतोस. अरे, आपण मूळ विषयापासून भरकटलो. या रॅफ्लेसियाच्या पोशिंदा वनस्पतीचं नाव

माहिती आहे का रे?

**महेश :** ही पोशिंदा वनस्पती आहे टेट्रास्टिग्मा या प्रजातीची. ही फक्त पर्जन्यवनात आढळते.

**आई** : महेश, तू म्हणालास की या रॅफ्लेसियाला मूळ, खोड, पानं काहीही नसतं, मग ते फूल कधी दिसायला लागतं?

**महेश**: फक्त, प्रजननाच्यावेळी ते पोशिंदा वनस्पतीच्या बाहेर दिसू लागतं. या रॅफ्लोसियाची कळी कोबीसारखी असून काळ्या-जांभळ्या रंगाची असते. (

आकृती क्र ४ पहा)



**आकृती क्र. ४: रॅफ्लेसिया अरनॉल्डीची कळी**

**आई**: ही कळी सुध्दा राक्षसी असेल ना?

**महेश**: (हसत) राक्षसी... अचूक शब्द वापरलास तू! ही कळी साधारण ३० सेंमी. रूंदीची असते. १९५६ मध्ये सुमात्रा येथे आत्तापर्यंतची सर्वात मोठी, ४३ सें.मी. व्यासाची कळी आढळली.


**आई**: बाप रे! ही कळी फुलायला किती दिवस लागतात?

**महेश**: किती दिवस...नाही, साधारण १ वर्ष लागतं

**आई**: मग फूल ही खूप दिवस टिकत असेल ना?

**महेश**: नाही, फक्त ५-७ दिवसच टिकतं. फुलाला ५ पाकळ्या असून त्या चांगल्याच जाड असतात. चित्रात

(आकृतीत क्र.५)



**आकृती क्र.५: फुलाचा आतील भाग**

राखविल्याप्रमाणे फुलातं तबकडीसारखा भाग असून त्यावर कुक्षी किंवा पुंकेसर असतात.

**आई**: महेश, सुरूवातीला तू म्हणालास. त्याप्रमाणे या फुलाच्या सडलेल्या मांसासारख्या वासाला परागण क्रिया करणारे कीटक माश्या आकर्षित होतात ना?

महेश: हो. आणखी एक गोष्ट. या वनस्पतीच्या काही जातींमध्ये नर आणि मादी फुलं वेगवेगळी असतात,तर काहींमध्ये उभयलिंगी फुलं म्हणजे स्त्रीकेसर व पुंकेसर एकाच फुलात असतात.

**आई**: याची फखं कशी असतात?

**महेश**: फखं गोल आणि त्यात खूप मांसल भाग असतो. या फळात अक्षरशः हजारो बिया असतात. या बियांना कठीण आवरण असतं.

**आई**: या बियांचा प्रसार जंगलातले प्राणीच करत असतील ना?

**महेश**: हो, झाडांमध्ये रहाणाऱ्या चिचुंद्री (Treeshrews) असतात ना, त्या या बिया खातात आणि पसरवतात.

**आई**: बेटा, एक सांग, या वनस्पतीची संख्या हवी

तेवढ्या प्रमाणात वाढत नसणार ना?.

**महेश:** तू कसं ओळखलंस?

**आई:** हे बघ, फूल ५ ते ७ दिवसच टिकतं. तेवढ्या अवधीत त्याचं परागीकरण व्हायला हवं. तू सांगितलंस त्याप्रमाणे वनस्पती एक लिंगी असेल तर दोन्ही फुलं एकाच वेळी फुलली पाहिजेत. तसेच ती जवळपास हवी. या कारणामुळे या फुलात प्रजननाचं प्रमाण कधी असणार, खरं ना?

**महेश:**अगदी १०० टक्के बरोबर! ही वनस्पती दुर्मिळ व्हायची, आणखी ही काही कारणं आहेत. या वनस्पतीला तसेच याच्या पोशिंदा वनस्पतीला विशिष्ट असे वातावरण लागते. तसेच पारंपारिक उपचाराकरिता हे फुलं महत्वाचे आहे. गोळा करून वाट्टेल त्यामुळे बेकायदेशीरपणे लोक ही फुलं तेवढ्या किंमतीला विकतात.

**आई:**हे फूल एवढं मोठ्ठं असल्यामुळे लोकं तेक बघायला ही येत असतील ना?

**महेश:**येतात ना... मलेशिया आणि इंडोनेशियामध्ये 'इकोटुरिझम' च्या अंतर्गत बरेच पर्यटक हे फूल बघायला येतात. पण त्या गडबडीत त्याच्या आजुबाजूला असलेल्या कळ्या तसेच पोशिंदा वनस्पतीचे नुकसान करतात.

**आई:**जपायला हवं ना या वनस्पतीला....

**महेश:**ही वनस्पती लुप्त होण्याच्या मार्गावर आहे. १९९७ साली तसा धोक्याचा इशारा ही देण्यात आला आहे. आई, या रॅफ्लेसियाच्या प्रकारातील पण रायझॅनथिस (Rhizanthes) प्रजातीची वनस्पती आहे. ही सुध्दा परजीवी असून त्याला मूळ, खोड, पानं नसतात.

**आई:** या वनस्पतीची, पोशिंदा वनस्पती कोण?

**महेश:** याची ही पोशिंदा वनस्पती टेट्रास्टिग्मा प्रजातीची. हिच्या मुळावर परजीवी वनस्पती वाढते.

**आई:** याचं फुलही खूप मोठं असतं का रे?

**महेश:** या फुलांचा व्यास साधारण १४ ते ४३ सेंमी एवढा असतो. या प्रजातीच्या ४ जाती आहेत.

**आई:**ही प्रजाती कुठे आढळते?

**महेश:**या प्रजातीची झाडं दक्षिण आणि दक्षिण-पूर्व आशियाच्या उष्णकटिबंधीय जंगलात आढळतात. या प्रजातीतील एका जातीचं नाव आहे, रायझॅनायिस लोंवी (Rlowii). ही वनस्पती बोर्निओ आणि सुमात्रात आढळते.

(आकृती क्र.६ पहा.)



आकृती क्र.६ : रायझॅनथिस

**आई:**या वनस्पतीचं काही खास वैशिष्ट्य आहे का?

**महेश:** हो...आहे ना. या वनस्पतीची फुलं उष्णता निर्माण करतात. एवढेच नाही तर ते स्वतःच तापमान नियंत्रित करू शकतात. परागीकरण करणाऱ्या कीटकांना आकर्षित करणे.हा या तापमानाचा उद्देश असतो.

**आई:**मला वाटतं महेश, या फुलांचं कुल (Family) एकच असेल ना?

**महेश:**हो..हो यांचं कुल आहे, रॅफलसिॲसी

**आई:** म्हणजे, थोडक्यात यांचे काही गुणधर्म सारखे,म्हणजे परजीवी वनस्पती, फक्त फुलच दृष्टिस पडतं. फुलांचा आकार मोठा, हो ना?

**महेश:** नेमक्या शब्दात मांडलंस बघ. या कुलातील सॅप्रिया (Sapria) नावाची आणखी एक प्रजाती आहे. याच्याही ४ जाती आहे, यापैकी सॅप्रिया हिमालयन या जातीची फुलं रॅफ्लेसिआ अरनॉल्डी सारखी दिसतात. त्याच्याइतकी महाकाय नाहीत. पण व्यास साधारण २० सें.मी. या फुलाला मात्र १० पाकळ्या असतात.

**आई:**महेश, किती वैविध्य आहे ना निसर्गात! त्याचा अभ्यास करावा, तेवढा थोडाच. शाब्बास! खूप छान माहिती मिळवलीस... जिज्ञासा अशीच काय ठेव.

संदर्भ : १) विकीपीडीया चित्रे-साभार आंतरजाल)



सर टि.वियानंद
नाशिक
९४०४५८५८८६

# आपल्याच फाजील आत्मविश्वासाची द्योतकं अन् बिघडतलेली गृहीतकं

युद्धाचा एक नियम असतो की शत्रूला कधीच कमी लेखून वा गृहीत धरून वा सहजवारी घेऊन मुळीच चालत नाही. मग ते अत्यंत तोकडी साधने असलेल्या व्हिएतनाम ने (अगदी जपानला ही एकेकाळी गुडघे टेकायला लावणाऱ्या) बलाढ्य अमेरिकेला हरवणं असो की मूठभर सैनिकांच्या मदतीने फ्रान्स च्या २०/२२ वर्षांच्या सेंट जोन ने ब्रिटिशांना सत्ता सोडून फ्रान्स मधून हूसकावून लावणं असो वा आपल्याच तानाजीचं मूठभरच मावळ्यांना घेऊन कोंढाण्याचा सिंहगड करणं असो... शत्रूचा मुकाबला पूर्ण ताकद व तयारीनिशीच करायचा असतो हेच इतिहास पुन्हा पुन्हा अधोरेखित करीत असतो. हे ज्यांना उमगलंच नाही त्यांना इतिहासातच जमा व्हावं लागलेलं आहे. हे लिहिण्याचं निमित्त आहे नाशिकसारख्याच इतरही अशाच काही शहरांतील कोरोनाचं वाढतं प्रस्थ...! या शहरांमध्ये कोरोना आता आवाक्याबाहेर जाण्याच्या तयारीत आहे की काय असच वाटतेय एकंदरीत परिस्थिती पाहून. अशाच काही शहरांचीही कमीजास्त प्रमाणात ही च अवस्था दिसतेय सध्या.. कारण आता प्रमाण खरच खूप वाढलेय/ वाढतेच आहे.. वाढता वाढता वाढे पसारा अशीच सध्या कोरोनाची येथील एकंदरीत वाटचाल दिसते आहे. कारण काय? तर फक्त मानवी अतिशहाणपणातून आलेला फाजील आत्मविश्वास आणि कशालाही फक्त गृहीतच धरून चालण्या/वागण्याची आत्मघातकी सवय. बस्स...मग काय...फैलाव तर धूमधडाक्यातच होणार ना..! यात नवीन असं मात्र काहीच नाही. का?? तर थोडसं मागे वळून पाहूया. यापूर्वी ज्या मोठ्या शहरांत असं प्रमाण वाढत गेलं होतं वा वाढलं, तिथल्या बातम्या वाचून पाहू एक एप्रिल पासूनच्या... तिथं नडलाय तो फक्त अतिशहाणपणाची किनार लाभलेला आत्मविश्वास अन् दिड दमडीची आपली फाजील आत्मविश्वास भरलेली मरतुकडी गृहीतकं. प्रशासन सतत सावधगिरी बाळगूनच व्यवहारांची अट घालत होतं. प्रत्येक गरज कसोशीनं अन् कर्मचारी तैनात करून अगदी जोखमी घेऊन पूर्ण करण्याचा प्रयत्न करतच होतं. (आताही ते च चालूय.) पुन्हा पुन्हा लोकांना फक्त थोडसं सहकार्य अक्षरशः भिक मागितल्यासारखं मागत होतं पण मस्तवाल अन् यशा पयशाची मुळीच चाड नसलेल्या काही बेमूर्वतखोर लोकांना ही शासन-प्रशासनाची आर्त साद नीट समजावून घ्यावीच वाटली नाही. अगदी चोवीस तास-दिवसरात्र फक्त या आपत्तीचे सुयोग्य नियोजन/ व्यवस्थापनाचाच विचार, चर्चा वा कार्यात गुंतलेल्या देशाच्या वा राज्याच्याही नेतृत्वावर फालतू विनोद करतानाही काही बेशरम लोकांना लाजा वाटल्या नाहीत. तिथं ही प्रशासनाने शब्दशः हात जोडून विनंत्या, मिनतवाऱ्या करून सुद्धा लोकांना फिरायला गेल्याशिवाय भागायचचं नाही... दहा-पंधरा दिवस भाजीशिवाय म्हणजे मरूनच जाणार वाटायचं...चार दिवस जरासं कडक केलं तरी चहासाठीच्या दुधाशिवाय जणू जीवंचं चालल्यागत व्हायचं...दारू ढोसायला मिळाली नाही तर जीव फारच कासाविस झाले...(हे दारू विक्रीला परवानगी मिळाल्यावर अगदी कोणतच डिस्टंस न पाळता दारू घेण्यासाठी अगदी जीवाच्या आकांताने पहाटेच्या १/२/३ वाजल्यापासूनच्या रांगा पाहून कळाले. जीवन धन्य धन्य झालं.) मग तो तरी का पसरू नये? पसरला एकदाचा. झाले सगळे शांत. नीट्टच जिरली ना... मग

सर्व काही बरोबर भागलं. तेव्हा मात्र काहीच अडचण नव्हती कोणाची.आपल्या या नवीन कोरोना वाढीसाठी असाच आपला फाजील आत्मविश्वास नडलाय... अन् आपली मरतुकडी गृहीतकं पडलीयेत गाढवं उकीरड्यावर निवांतपणे जाऊन पडावीत तशी तंगड्या वर करून. एवढच नव्हे; तर आता ती गृहीतके पार बिघडलीयेत असं म्हटलं तरी वावगं ठरू नये. कहर म्हणजे पुन्हा काहीजण थोबाडं वर करून निर्लज्जपणे प्रशासनाकडंच बोटं दाखवतात. आता बोलू नये पण...आपल्या सगळ्याच गोष्टींसाठी आपण प्रशासनाचीच वाट पहातो का? देशाचा एक जबाबदार नागरिक म्हणून या आपत्तीच्या काळात प्रशासनाला सहकार्य काय आपला बाप करेल का?मोठ्यातल्या मोठ्या श्रीमंत देशातही केलं गेलेलच नाही एवढं आपल्या राष्ट्रीय व राज्य प्रशासनानं कोरोनापासूनच्या आपल्या बचावासाठी केलेल आहे. आताही ते युद्धपातळीवर चालूच आहे.. बातम्या पाहून ही हे लक्षात येत नसेल तर मग जे आहे ते खुशाल चालू द्यावं. कळेल काय होत असतं ते. तसं ही सध्या इथं जो तो ऊठतो अन् त्यात काय एवढं? असं कुत्सितपणाने विचारत निघालाच मास्क बांधून दौरा करायला... बाकीच्या precautions ना नेहमीप्रमाणेच वाटाण्याच्या अक्षता. मला हे च नाही कळतयं की फक्त मास्क म्हणजे काय या लोकांना एखादं आंतरखंडीय एन्टीबॉम्बर मिसाईलच वाटतं की काय कोण जाणे बुवा...! बाकीचं काही काळजी घेण्यासारखं जे आहे ते तर मग सगळंच अलहिदा. अन् पुन्हा अशा परिस्थितीतही तो (कोरोना) न पसरण्याचा विचार करणं म्हणजे गांजाचं झाड लावून त्याला सफरचंद लागण्याची अपेक्षा करीत बसण्यासारखच नाही काय? निसर्ग कधीच कुठेच ०.००००१% ही चुकीचं काम करीत नाही. तो विषाणू एवढा ही काही हलक्या (निम्न) प्रजातीतला तर निश्चितच नाही की स्वतःहून वा अनाहूतपणे आगंतुकसारखा स्वतःहून कोणाच्या घरी जाईल. हे एव्हाना जनतेला पूर्णपणे कळून चुकलेलंच आहे. तरीही प्रत्येकच गोष्टीला आपल्या स्व-विचारांप्रमाणेच गृहीत धरण्याची लोकांची सवय (कधी कधी तर ते स्वतःच जातात/ जातच आहेत. पण सवय मात्र इथं खाली असेपर्यंतही) काही केल्या जातच नाही. वैज्ञानिक सिद्धता पावलेल्या गोष्टीही गृहीतच धरायच्या म्हणजे अतिच झालं... आपल्या तकलादू गृहीतकांमुळंच त्या गोष्टी आतापर्यंत आपल्याला चांगलाच इंगा दाखवत आलेल्या आहेत आणि दाखवणारच आहेत. उदा. द्यायचं झालंच तर हे असं गृहीत धरणं म्हणजे मी महान तपस्वी संत महात्मा वगैरे आहे. साक्षात् मी देवाचं रूपच आहे. म्हणून मला कोण काय इजा करेल...?, असं गृहीत धरून एखाद्या थोर संत/ महात्म्याने अणूबॉम्बला कवटाळून बसण्यासारखेच आहे. मग काय? तो फुटणार अन् महात्म्याचा परमात्मा चिंधड्या उडूनच होणार. (म्हणजेच The End)... कारण अणूबॉम्ब हे एक वैज्ञानिक सिद्धता पावलेलं त्रिकालाबाधित सत्य आहे. तिथं भावनिक वा ऐच्छिक गृहीतकं मुळीच नाहीत चालत. फक्त वैज्ञानिक सत्यच चालतं. हे सत्य स्विकारूनच विचारपूर्वक वागणं/ सामोरं जाणं अपेक्षित आहे/ असतं. नाहीतर मग आपली स्वतःची पायली आता भरलीय असं गृहीत धरून चालायला काही हरकत नाही. अन् अशी हरकत नसावी सुद्धा. कारण मग ती (म्हणजे पायली) भरल्याचा परिणाम संबंधित गृहीत बहाद्दर व्यक्तीसापेक्ष होणारच आहे. तसाच तो आता कोरोनाबाबत होतो आहे. कोरोना विषाणूबाबत योग्य ती पूर्वकाळजी/ खबरदारी (means-precaution) घेण्यात केलेली वा चूकूनही झालेली किंचितशीही गफलत/चूक इथं मुळीच माफ नाहीच. हे एक वैज्ञानिक सिद्ध पावलेलं सत्य आहे. जसं की कळ दाबल्यावर दिवा लागतोच. कोरोनाच बरयं. तो मात्र कोणालाच गृहीत वगैरे धरीत नाही. थेट हमलाच. अन् पुढचा खमक्याच निघाला तर आल्या पावली परत...

मला निसर्ग अधूनमधून थोडाफार कळतो. काजवा चमकल्यासारखाच म्हटलं तरी चालेलं. भरपूर वेळा बरेच दिवस दररोज ७/८/९ घंटे जंगलात एकटच फिरून फिरून काही गोष्टी शिकायला अन् (जराश्या भयानकच म्हणता येईल अशा) अनुभवायला सुद्धा मिळाल्यात. मला एक लक्षात आलं, की निसर्ग कधीच कोठेच चुकीचे कार्यक्रम अजिबात राबवित

नाही.जो निसर्गाला प्रत्येक बाबतीत गृहीत धरून चालायला लागतो, त्याचा लाईफ क्लायमॅक्स च चालू झालेला असतो समजायचं... कारण लवकरच पडद्यावर the end दिसणार असतं. आणि मग शेवटी ... then they lived happily प्रमाणेच .... then they became heavenly येऊन गेलेलं बाकी लोकांना कळतही नाही.

**(सर टि.विद्यानंद हे जि.प.नाशिक येथे पदविधर अध्यापक म्हणून कार्यरत आहेत.)**

## माझी कविता

# शाळा प्यारी हाय !



कोणीतरी माझे ,
प्रश्न ऐकाल काय ?
मनातल्या प्रश्नांचे ,
उत्तर मिळेल काय ?
टाळाबंदी बंद होऊन ,
शाळा भरेल काय ?।। धृ।।

तीन महिने घरात बसून,
उबग आलाय फार
गेम खेळून ,टिव्ही बघून,
झालो मी बेजार
कोरोनावर लस कधी ?
कोणी सांगू शकेल काय ?।।१।।

अभ्यास नाही, खेळ नाही,
फक्त बातम्यांचा भडीमार
गाणी नाही ,गप्पा नाही ,
मित्र - मंडळी पसार
दूरावलेले मित्र माझे ,
पुन्हा भेटतील काय ?।।२।।

रस्ते बंद ,बाजार बंद ,
बंद सारे घरदार
पोलीसमामा ,नर्सताई,
डॉक्टर सुद्धा थकले फार
पहिल्यासारखं सुरळीत
जीवन कधी होणार हाय ?।।३।।

डॉक्टरकाका लस शोधून,
कोरोनाला घालवा
गुरुजी आणि बाई तुम्ही ,
शाळा लवकर भरवा
गाणी , गोष्टी, गप्पांची
मेजवानी मिळेल काय ?।।४।।

घेण्या नवी भरारी
शाळेमधे यायचं हाय
संस्कार अन् शिस्तीचे
धडे गिरवायचे हाय
प्रेमभरे, आपुलकीची
शाबासकी मिळेल काय ?।।५।।

शाळेमधे ,मैदानावर,
खेळ खेळायचे हाय
मित्रांसोबत ,आनंदाने
गप्पा मारायच्या हाय
घरासोबत मला माझी ,
शाळाही प्यारी हाय !।।६।।

**मनोहर मोहरे**
(चाकण जि.पुणे
८६६९१५८२७६)



क्षमा द.साळी
एरंडोल जि.जळगांव
९४०५६२६४५९

# करोना आणि मी

'तुम उसे छू लो और वह तुम्हारा हो जाय,इतनी वफ़ा तो सिर्फ करोना में ही है श्र ,हा मेसेज वाचला आणि दुःखातही हसू आलं. दुःखी हसणं ज्याला म्हणता येईल अशी माझी अवस्था होती,तशी मी शारीरिक व मानसिक दृष्टया एकदम स्ट्रॉन्ग आहे, नियमित व्यायाम व प्राणायाम करणारी. मला काहीही होणार नाही अस समजणं आणि म्हणनारी मी! आज एरंडोल ला कोविड सेंटर ला पॉजिटिव म्हणून ट्रीटमेंट घेतेय.अचानक तोंडाची चव गेली,प्रचंड थकवा जाणवू लागला आणि आम्ही उभयतांनी खाजगी lab मध्येswab चेक करायला दिले, त्या दिवसांपासून मी मानसिक रित्या खचून गेली, माझे पतिराज, ते पण मनातून घाबरले असतील पण वर वर आम्हाला धीर ,आधार देत होते. माणसं त्यांचं दुःख, चिंता दाखवत नाही फक्त आधार देतात म्हणूनच त्यांना आधार स्तम्भ म्हटले जात ते काही खोटं नाही.माझा मोठा मुलगा तर क्षणात शहाणा झाला तसा तो समजदार आहेच ,लहान तर इतका धीर देत होता ,अगं तू एवढी डेअरिंग बाज मम्मी आणि काय घाबरते?,आणि स्वतः पुढच्या रूम मध्ये जाऊन रडू लागला,त्यात मी यांना म्हणते ,काहो तुमची प्रत्येक गोष्टीला नकारघंटा असते ,मग काय रिपोर्ट पण निगेटिव च का? आणि मी प्रत्येक गोष्टीत पॉजिटिव असते मग काय माझा कोरोना रिपोर्ट पण पॉजिटिव का? हा जरी विनोदाचा भाग असला तरी मी पळून तर जाऊ शकत नव्हते..मग लढायचे ठरवले.

कासोदयाचे डॉ.पांडुरंग पिंगळे, त्यांचा मुलगा डॉ. मकरंद पिंगळे व त्यांची पत्नी डॉ. राधिका यांनी खुप धीर दिला व जवळच्या कोविड सेंटर ला दाखल व्हावे म्हणून सूचवलं .त्यानुसार मी दाखल झाले.सोबत चेतना मेडिकल वाली मिनाताई पण होती , अतिशय घाबरलेली पण मीच धीर दिला आणि आपण सुखरूप परत येऊ अशी हिम्मत दिली, खरं तर कोरोना वाटतो इतका भयानक पण आहेच वेळीच काळजी घेतली नाही तर...आणि घाबरण्यासारखा पण मुळीच नाही आत्मविश्वास असला तर!...संध्याकाळी जेवायला जातांना एक छोटीशी मुलगी दिसली मोठं ताट घेऊन जातांना, मी तिच्या बरोबर च्या मुलीला विचारल ही कशी?तेव्हा समजल तिचे आजोबा कोरोना ने वारले, ही आणि हिची आजी पॉजिटिव आली, आजी सतत रडत असते आणि ही छोटीशी झाशी ची राणी आजीला सांभाळतेय!, .....मी विचार करू लागले ही छोटी शी मोहिनी इतक्या हिमतीने लढू शकते मग मी का घाबरावं ? आणि मी मिनाताई बरोबर छानसं रूटीन सुरु केलं, ....सुरुवातीला झोप येईना, मग जुनी गाणी, भजनं ऐकत झोपणे, सकाळी प्राणायाम ,योगा, मग नाष्टा, मग वाचन, त्यात सर्व हितचिंतकांचे फोन अस करत नऊ दिवस केव्हाच सरले...मिना ताईने अर्ध मेडिकलच सोबत आणलं होतं, त्यामुळे प्रत्येक दुखण्यावर गोळी हजर, माझी खुप छान काळजी घेतली ताईने,...ती सतत वैतागलेली असायची अशा वेळी ताई ध्यान लाव असा सल्ला मी द्यायची , ताई म्हणायची तुझ्यामुळे मला खुप छान शिकायला मिळाले , बरं झालं मला कोरोना झाला ! वाटलं चला आपल्या कोरोनाचा कुणाला तरी चांगला फायदा तरी झाला.

येणाऱ्या बायकांना रडतांना पाहून त्यांना मी सांगायची, वहिनी, तुमच्या लग्नापासुन तुम्हाला दहा दिवस कुणी इतका आराम दिलाय का? मस्त आराम करा, टेंशन घेऊ नका, आनंदी रहा आणि निरोगी रहा, लवकर बरे व्हाल,...त्यांनाही छान वाटायचे. त्यात

लहान मुलगा पॉजिटिव आला, पण आता आम्ही घाबरणार नव्हतो, बाकी सर्व सासु ,सासरे,मोठा मुलगा निगेटिव आले,तो एक आनंद होता कारण सासऱ्यांना लकवा असल्यामुळे खुप हाल झाले असते, पण 'माझी काळजी देवाला असते', हे माझ ब्रीदवाक्य आहे...इथे आल्यापासुन शनि शिंगणापुर ला आल्यासारखं वाटत होत, कितीही महागड़ा मोबाइल किवा दागिना वर पडलेला असेल तरी कुणी हात लावायची हिम्मत करत नव्हतं, वेळोवेळी तीर्थसारखं सैनीटायज़र हातावर घेणं, दर्शनाला जातात तसं नाष्टा , जेवण घ्यायला जाणं, हसू पण येत होत आणि एंजॉय पण करत होतो.

दरम्यानच्या काळात माझ्यावर किती जण प्रेम करतात याचा प्रत्यय आला, माझ्या सासरच्या,माहेरच्या जिवलगांबरोबरच, माझे सर्व मित्र , मैत्रीणी, नातेवाईक, हितचिंतक, अधिकारी, सहकारी, आणि सर्व जिवलग माझ्यासाठी प्रार्थना करत होते,मला हिम्मत देत होते, त्या सर्वांची मी खुप आभारी आहे, मी इथे असतांना माझ्या घरी सासु सासरे, पत्नी यांची फजीती होऊ नये म्हणून आमच्या सरलाताई आणि त्यांची मुलगी वैशाली रोज त्यांच्या घरून पोळया करून देत होत्या, नेहमीच काळजी घेणारे माझे भाऊ, वहिनी ,भाचे,बहिणी, मेव्हणे,नणंद, भाची यांच्याबद्दल तर लिहावं तितकं थोड़च आहे, यासाठी फक्त नशिब असावं लागतं.

एरंडोलच्या कोविड सेंटर ला खुप छान काळजी घेतली जाते. अतिशय स्वच्छता आहे इथे. आम्ही त्या संपूर्ण स्टाफ चे खुप आभारी आहोत,

....वेळच्या वेळी जेवण , औषध ,२ वेळा काढ़ा दिला जात होता, इथली जेवणाची व्यवस्था कंत्राट घेतलेले हॉटेल कृष्णा चे मालक कृष्णा भाऊ यांनी अतिशय रूचकर व पोषक जेवण व नाष्टा दिला..... तसच ताई ,अजुन काही लागलं तर सांगा बरं असं आवर्जून सांगत होते...आम्ही त्यांचेही खुप आभारी आहोत ...इथे मला आर्शिया,आश्विनी,मोहिनी सारख्या नविन छोट्या मैत्रीणी भेटल्या, करता येईल तेवढी मद्त सर्वांना करत होते, बरेच जण म्हणत होते लवकर घरी या तुम्हाला भेटायच आहे पण मी त्यांना सांगू इच्छिते , तुम्ही म्हणता ते सर्व ख़रं आहे पण माझ्या मते दुरुनच बरं आहे.शेवटी परमेश्वरापेक्षा मोठं कुणी नाही,...म्हणून डॉ. पिंगळे यांनी पाठवलेली प्रार्थना मी रोज ऐकत होते, 'ये मत कहो खुदासे, मेरी मुश्किलें बड़ी है, ऐ मुश्किलों से कह दो मेरा खुदा बड़ा है/'.... माझे स्वामी समर्थ,गजानन महाराज,सप्तशृंगी माता यांचे नामस्मरण मला एक वेगळी शक्ति देत होते

आपण सरकारी दवाखान्याला नेहमी नावं ठेवत असतो पण खाजगी दवाखान्या पेक्षा उत्तमसुविधा इथे देतात .इथल्या व्यवस्थेचं मी मनापासून कौतुक करेन व आभार मानेन कि अतिशय चोख व्यवस्था ठेवली आहे....या सर्व योग्य मेडिकल ट्रीटमेंटचे व चोख व्यवस्थेचे श्रेय आदरणीय मा. प्रांतसाहेब, मा. तहसीलदार मॅडम,मा.डॉ. कैलास पाटील, मा.डॉ. शेख, मा.डॉ. राधिका पालवे तसेच नगरपालिका एरंडोल यांना जाते...मी त्या सर्वांचे... आणि अगदी वॉचमन पासून सर्व सफाई कामगार यांचेही खुप आभारी आहे,....शेवटी एवढा संदेश देईन कि कोरोना ९९टक्के बरा होतो,घाबरून जाऊ नका व दुर्लक्ष करु नका,आत्मविश्वासाने सामोरे जा,शेवटी एवढंच म्हणेन ...मेरा आपकी कृपा से सब काम हो रहा है,करते हो तुम मेरे स्वामी नाम मेरा हो रहा है!

**( क्षमा दत्तात्रय साळी ह्या जि.प.शाळा खडकेसिम ता.एरंडोल जि.जळगांव येथे कार्यरत आहेत.)**



ऑनलाईन शिक्षण...



डॉ.हर्षदा पुराणिक
शहादा-नंदुरबार
८४२१४४५७६८


# टिलीमिली... नवसंजीवनी

कोरोना प्रादुर्भावाच्या नियंत्रणासाठी लागु करण्यात आलेल्या टाळेबंदी मुळे मार्च २०२० पासुन महाराष्ट्रातील शाळा बंद करण्यात आल्या. त्या अदयापही उघडला आल्या नाही. देशातील सर्व स्तरावरील प्रगतीचा आलेख थांबलाच नाही, तर त्याला ग्रहणच लागले. त्याचप्रमाणे शिक्षण क्षेत्रातही परिणाम होऊन-विद्यार्थी-पालक चिंतीत आहे त्यामुळे शालेय विदयार्थ्यांचे अपरिमित नुकसान होत आहे. तसेच प्रत्येक घरोघरी आपत्कालीन पर्यायी शिक्षणाची व्यवस्था उभी राहू शकली नाही. शाळा नियमीत कधी व कशा सुरू होतील याची अनिश्चितता असल्याने सर्वत्र गोंधळाचे वातावरण आहे.

कदाचित शहारातील व सधन कुटुंबातील विदयार्थी ऑनलाईन व्हिडीओ व नवनवीन शैक्षणिक ॲप्स द्वारे ज्ञान-प्राप्त करत आहेत पण खरी अवहेलना दुर्गम भागातील गरीब कुटुबांतील विदयार्थ्यांची होत आहे. या भागात मोल मजुरी करणाऱ्या पालकांकडे ॲंड्राईंड मोबाईल नाही. असेल तर नेटवर्क नाही. आणि रोजंदारीची वणवण! यामुळे विद्यार्थी शिक्षणापासून दुर जात होते.

शिक्षकांनी पुर्ण प्रयत्नांनी नवीन पाठ्यपुस्तके घरोघरी पोहचवली. स्वाध्याय ही दिले पण प्रत्यक्ष शिक्षणाचा प्रभाव दिसत नव्हता अशा अपवादात्मक परिस्थितीत ''एमकेसीएल नॉलेज फाऊंडेशन'' या पुण्यातील स्वयंसेवी संस्थेने पहिली ते आठवी इयत्तांच्या पहिल्या सत्राच्या सर्व विषयांचे मराठी माध्यमातील शिक्षण दुरदर्शनच्या सह्याद्री वाहिनी वर दैनंदिन महामालिके द्धारे मोफत सुरू केले.

मुलांना आवडावे या करिता या महमालिकेचे नाव ''टिली मिली'' छान ठेवण्यात आले आणि मालिका



सुरू झाली. आणि टिलीमिलीच्या शीर्षक गीताने अनेकांना भुरळ घातली.

माझी शाळा माध्यमिक विद्यालय बामखेडा ता.शहादा. आम्ही ही इ.पहिली ते आठवीच्या मुला-मुलींना ''टिली मिली'' या मालिकेविषयी घरो घरी जाऊन समजावले.वेळापत्रक सांगितले. आम्ही ही रोज मालिकेद्वारे मार्गदर्शन करू लागले. मालिका बघुन नोट्स काढू लागलो. प्रत्येक क्षमतेच्या विद्यार्थ्यांना समजेल असे कृतीयुक्त व परिसरातुन प्राप्त होईल असे उपक्रमशील शिक्षण यातुन प्राप्त होत आहे. मुलांना कंटाळा येऊ नये म्हणून सलग व्याख्याने नाही. मध्येच नाविण्यपुर्ण गीत, माहिती व सहभागी मुले किती सुंदर



स्वच्छ आनंदाने शिक्षण घेतात. सहभाग घेतात. प्रश्नोत्तरे देतात हे पाहुन विद्यार्थ्यांनाही खुप शिकायला मिळाले.

आज माझ्या वर्गातील व विद्यालयातील विद्यार्थी मालिका आनंदाने पाहत आहेत.ज्या विद्यार्थ्यांकडे टिव्ही संच नाही ते परिसरातील मित्रांच्या घरी जाऊन पाहत आहे. स्वत: एकत्र गोळा होऊन अभ्यास करत आहे. मला फोनवर सर्व प्रश्नोत्तरे व अडचणी विचारत आहे. एक प्रकारे माझ्या शाळेतील विदयार्थी शैक्षणिक प्रवाहात आले.तसेच आमचे मुख्याध्यपक श्री. एस.एस.पाटील सर याच्या नित्य मार्गदर्शनाने प्रत्येक विद्यार्थ्या पर्यंत पोहचवण्यात आम्हाला यश आले आहे.

**'टिली मिली' कार्यक्रमाची नाविण्यपुर्ण वैशिष्ट्ये:**

✻ विनामुल्य सह्याद्री वाहीनीवर उपलब्ध.

✻ राज्यातील दुर्गम भागातही उपलब्ध होत आहे.

✻ सर्व क्षेत्रातील श्रीमंत अथवा गरीब विद्यार्थी यांना शैक्षणिक प्रवाहात आणले.

✻ सर्व मालिका प्रसन्न वातावरणात व समजेल अशा भाषेत मांडली आहे.

✻ प्रत्येक विद्यार्थ्यांचे भौगोलीक वातावरण व मानसिकतेचा अभ्यास करूण मालिका निर्मिती.

✻ आनंददायी व ज्ञानरचनावादी शिक्षण प्राप्त होत आहे.

✻ हसत खेळत मनोरंजनात्मक शिक्षण मिळत आहे. कृतीयुक्त व उपक्रमशिलतेला महत्त्व दिले आहे.

✻ पालक व विदयार्थी यांना सामावून घेणारी मालिका.

✻मराठी समजणाऱ्या सर्व माध्यमाच्या विदयार्थ्यासाठी लाभदायी.

या स्वयंसेवी संस्थेने असेच नवनवीन शैक्षणिक उपक्रम नियमित निर्माण करावे व आम्हीही त्यात सहभाग घेऊ. एम.के.सी.एल.नॉलेज फाऊंडेशनने टिलीमिलीच्या माध्यमातून टाळेबंदीच्या काळात शिक्षणात नवसंजीवनी आणल्याबद्दल त्यांचे आभार मानावे तेवढे कमीच आहेत.

**(हर्षदा पुरणिक-पत्की ह्या पी.एम.सी.माध्यमिक विद्यालय बामखेडा त.त.ता.शहादा जि.नंदुरबार येथे शिक्षिका म्हणून कार्यरत)**





नितीन नंदा प्रभू केवटे
त्र्यंबकेश्वर-नाशिक
७२१८६०१५१०

# स्क्रीन टाईम करा कंट्रोल...

करोनाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी देशात लॉकडाउन जाहीर करण्यात आलं व 'वर्क फ्रॉम होम' हे नवीन फॅड सुरू झालं तेंव्हापासून लोकांचा स्क्रीन टाईम वाढत असल्याचं समोर आलं. याचबरोबर सोशल मीडियाचा वावरही वाढलाय. आठवडाभरात सोशल मीडियावरील वावर तब्बल ८७ टक्क्यांनी वाढला आहे. लॉकडाउनच्या आधी एक व्यक्ती आठवड्याला १५० मिनिटं सोशल मीडियावर घालवत होती तोच वेळ आता आठवड्याला २८० मिनिटं इतका झालाय, म्हणजे दिवसाला तब्बल चार तास लोक सोशल मीडियावर वावरू लागले आहेत.या सर्वांमुळे डेटा वापरातही तब्बल ३० टक्के वाढ झालीय. परिणामी, अनेकांचा स्क्रीन ॲडिक्शनसारखं जाणवू लागलेलं आहे.हा लॉकडाउन काही काळापुरताच मर्यादित आहे. जेव्हा तो संपेल आणि सर्वजण नियमित कामाला सुरुवात करतील तेव्हा स्क्रीन टाईम कमी करणं त्रासदायक ठरणार असल्याचं तज्ज्ञांचं मत आहे. सध्या स्क्रीनमध्ये रमल्यामुळे अनेक तरुणाचे मानसिक संतुलन बिघडण्याचे प्रकारही समोर येऊ लागले आहेत. परिणामी, घरात भांडणंही होत असल्याचं समोर आलं आहे. यामुळे आपण आत्ताच स्क्रीन टाईमला लगाम लावणं आवश्यक आहे.

हे कसं करता येईल ते बघूया पुढील ॲप च्या मदतीने .ॲक्शन डॅश चे

'डिजिटल वेलबिईंग' हे ॲप प्ले स्टोअर वरून मोफत डाऊनलोड करून घ्या. आपल्या स्क्रीन टाईमची काळजी घेण्यासाठी सर्वांचा मित्र आणि लोकप्रिय सेवा गुगलनेच सर्वाधिक

काळजी घेतली आहे. हे ॲप फोनच्या सेटिंगजमध्ये



दिसतं. तुम्ही किती वेळ स्क्रीनवर असता, कोणतं ॲप किती वेळ वापरता इथपासून सर्व तपशील ॲपमध्ये नोंदवला जातो. यामुळे तुम्ही कोणत्या ॲपवर अनावश्यक वेळ वाया घालवत आहात हे ठरवता येऊ शकतं. यात असे काही टूल्स आहेत ज्याचा वापर करून तुम्ही एखादं ॲप अमुक एक वेळ वापरल्यावर ते ॲप आपोआप बंद होतं. उदाहणार्थ, दिवसाला युट्यूबचा वापर ३० मिनिटं करायचा या अनुषगानं सेटिंग केली तर ३० मिनिटं वापर झाल्यावर ॲप सुरू होणार नाही. हे सुरू करण्यासाठी सेटिंगजमध्ये गेल्यावर तुम्ही प्रत्येक ॲपनुसार वेळ निश्चित करून ठेवू शकता.

या ॲपची लिंक खाली दिलेली आहे.

https://play.google.com/store/apps/details?id=com.actiondash.playstore

**(नितीन नंदा प्रभू केवटे हे शासकीय आश्रमशाळा तोरंगण ता.त्र्यंबकेश्वर जि.नाशिक येथे शिक्षक म्हणून कार्यरत)**

मागे वळून पहाताना...



**महेंद्र बंसीलाल अहिरे**
शिरपूर जि.धुळे
९४२३४९६४३६

# रंगीत दूरदर्शन ...

**रंगीत दूरदर्शनचे भारतात आगमन– १९८२**

आजकालच्या हजारो चॅनेल्सच्या गराड्यात गुरफटून गेलेला पन्नाशीतल्या तरूणाला बालपणीच्या दुरदर्शनची आठवण झाली तर सुरवातीला समोर येतो, ऐन्टेना! आणि ब्लॅक ॲन्ड व्हाईट टि.व्ही.टिव्हीचा जूना संच म्हणजे चौकोनी मोठा डबा. त्याला झाकण्यासाठी प्लायवूडचे सरकते लहान दरवाजे. खट खट आवाज करणारे, जोर लावून फिरवावे लागणारे बटण. घराच्या गच्चीवर चढून दुरदर्शन संचावरील 'मुंग्या येणारे चित्र' व्यवस्थित कसे दिसेल यासाठी वारंवार फिरवावा लागणारा ऐन्टेना आठतोच. अशा गावामधून किंवा गल्लीत एखादाच दूरदर्शन संच असलेले घर मुलांच्या गर्दीने गजबजून गेलेले असायचे. रामायण, महाभारत, जंगलबुक, मालगुडी डेन, चित्रहार आदि कार्यक्रमासाठी होणारी गर्दी आठवली तर आजच्या मुलांना त्याचं काहीच अप्रुप वाटणार नाही. त्याकाळी कृष्णधवत टि.व्ही असला तरी मोठे वाटायचे तर रंगीत चित्र दिसणारे संच. श्रीमंतचं लक्षण मानली गेली.

टेलिव्हीजन या शब्दाचा उगम ग्रीक शब्द टेले म्हणजे दुरचे आणि लॅटीन शब्द व्हिजन म्हणजे दृश्य या दोन शब्दातून झाला. आणि भारतात आपण त्याला दूरदर्शन म्हणतो. सरकारी योजनांच्या प्रसारणासाठी १९५९ मध्ये दूरदर्शनची स्थापना झाली. अर्थात दुरदर्शनवरील चित्र कृष्णधवल ब्लॅक अँड व्हाईट होते. हा दुरदर्शन सर्वत्र कुतूहलाचा विषय ठरला होता. या दुरदर्शनवरुन सरकारी योजनांची माहिती, कुटूंबकल्याण, लोकसंख्या नियंत्रण याचे प्रक्षेपण हाच मुळ उद्देश्य होता. १९७५ पावेतो भारतातील फक्त ७ शहरांमध्ये टीव्ही सेवा होती.

मात्र १९८२ साली भारतात एशियाड क्रिडास्पर्धा चे आयोजन करण्यात येणार होते. म्हणून या स्पर्धा रंगीत स्वरूपात देशभरातील लोकांना पहाता याव्यात यासाठी रशियाच्या सहकार्याने रंगीत दुरदर्शनची यंत्रणा उभारली गेली. आणि १५ ऑगस्ट १९८२ ला पंतप्रधान इंदिरा गांधी यांच स्वातंत्र्य दिनाचं भाषण हे रंगीत प्रसारणाचा पहिला कार्यक्रम ठरलं. आणि दुरदर्शन राष्ट्रीय प्रसारक म्हणून अस्तित्वात आले.

दूरदर्शन

सत्यम् शिवम् सुन्दरम्

सुरवातीला रंगीत दुरदर्शन हा महागडा असल्याने मोजक्या लोकांकडे होता. कार्यक्रमामध्ये रटाळपणा फक्त सरकारी कार्यक्रम यामुळे लोकसंच घेत नव्हते. १९८४ पासून खासगी निर्मात्यांनाही कार्यक्रम प्रसारीत करण्याची परवानगी देण्यात आली. हम लोग ही पहिली मालिका ७ जुलै १९८४ पासून तसेच कमी कार्यक्रम प्रसारित होत. प्रसारित होणारी पहिली मालिका ठरली. नंतर मग बुनियाद, नुक्कड, मालगुडी डेज, इंतजार, जंगल बुक, टिपूसुलतान या कार्यक्रमांनी दुरदर्शनची लोकप्रियता वाढवली. त्यातच लोक प्रियतेचा कळल गाठणाऱ्या 'रामायण' १९८७ व 'महाभारत' १९८८ या मालिकांनी पूर्ण भारतभर लोकांना मंत्रमुग्ध केले.

सध्या दूरदर्शनचे २३ चॅनल्स कार्यरत आहे दोन डी डी नॅशनल, डी डी न्यूज, ११ प्रादेशिक भाषेचे उपग्रह चॅनेल, राज्यसभा, लोकसभा अशा वाहिन्या कार्यरत आहेत. दूरदर्शनचे ब्रीदवाक्य सत्यम शिवंम सुंदरम असे आहे.

**(महेंद्र बन्सीलाल अहिरे हे जि.प.शाळा धारबर्डी ता.शिरपूर जि.धुळे येथे प्राथमिक शिक्षक म्हणून कार्यरत आहेत.)**

क्रिडा दिना निमित्ताने ...



**डॉ.एल.के.प्रताळे**
शिरपूर जि.धुळे
८७९३१४९६५७

# चढ उतार क्रीडा क्षेत्रातील...



सन १६०० या वर्षी इंग्रज साम्राज्य भारतात स्थिर होण्यास सुरुवात...१८०२ वसईच्या तहाने भारतात वेगळया साम्राज्याचा अंमल सुरू झाला.

इंग्रजांनी भारतावर १५० वर्षे राज्य केले. त्यांनी राज्य करत असतांना भारताला आधुनिक काळात आणले ही सत्य परिस्थिती आहे. कारण इंग्रजी माध्यमातून भारतीय समाजात एकता निर्माण होऊन राष्ट्रीय चळवळ उभी राहिली आणि भारताला१९४७ ला स्वातंत्र्य मिळवून दिले.पण इंग्रजांनी आधुनिक हा शब्द खुप चांगल्या पद्धतीने वापरला,त्यांनी अनेक सुधारणा घडवून आणल्या त्यात काही त्यांनी अप्रत्यक्षपणे क्रीडा क्षेत्राच्या विकासासाठी प्रयत्न केला.

गव्हर्नर जनरल लार्ड रिपनने एन विल्यम डब्ल्यू सर हंटर यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापना केली. सर विल्यम हंटर हे एक इंग्रज अधिकारी मुत्सुद्दी हुशार आणि उदारमतवादी होते. त्यांचे शिक्षणाविषयी त्याचे मत उदार होतेच पण त्यांनी स्वतः निर्णय व जबाबदारी न घेता भारतीय व्यक्तींकडून भारतीय शिक्षण सुधारणा विषयी मत घेतले,त्यात अनेक भारतीय व्यक्तींनी आपली मते नोंदवली प्रामुख्याने महात्मा जोतिबा फुले, सावित्रीबाई फुले, ताराबाई, रमाबाई पंडित अशा अनेक नामवंत व्यक्तींनी मते दिली.या कमिशनने सर्व प्रातांना भेट देत सुमारे २०० अधिनियमसह १८८२ ला अहवाल सादर केला त्यात त्यांनी अनेक शिफारशी केल्या होत्या..

- ✻ प्राथमिक शिक्षणास प्रोत्साहन
- ✻ खाजगी पुढाकारास प्रोत्साहन
- ✻ नैतिक शिक्षण
- ✻ शारीरिक शिक्षण
- ✻ महिला शिक्षण
- ✻ मुस्लिम शिक्षण

प्रामुख्याने यावर भर दिला होता. आधुनिक शिक्षण पद्धतीने भारतीय संस्कृती रुजत राहिली.पण याच काळात शारीरिक शिक्षणावर भर देण्यात यावा हे स्पष्ट मत सर विल्यम हंटर यांनी आपल्या आयोगात केलं होतं...

जर भारताला सुधारणा द्यायच्या असतील तर शारीरिक शिक्षणावर दुर्लक्ष करता कामा नये.कारण तेव्हा ब्रिटिश साम्राज्यात क्रिकेट खेळाचा विकास होत होता. ग्रीक संस्कृती याला कारणीभूत ठरली होती, तेव्हापासूनच प्राथमिक शिक्षणाबरोबरच शारीरिक शिक्षण देणे आवश्यक आहे हे सांगितले, त्यासाठी प्रत्येक शाळेत शारीरिक शिक्षक नियुक्त करण्यात यावा हे त्यांनी आपल्या अहवालात नमूद केले होते...

शारीरिक क्षमता ओळखण्यासाठी त्यांनी भरपूर प्रमाणात योजना तयार केल्या होत्या. त्या काळात तरी त्या व्यवस्थित होत्या. आता पुस्तकांचा बोजा विद्यार्थ्यांच्या डोक्यावर देऊन शारीरिक शिक्षणाला दुय्यम स्थान दिले जातेय. शारीरिक क्रीडा शिक्षकांच्या तासिका कमी करून क्रीडा क्षेत्राचा विकास करू पहाण्याचा निर्णय, शारीरिक शिक्षकांच्या संघटन शक्तीमुळे धुळीस मिळाला.

इंग्रजांनी १८८२ मध्ये शारीरिक शिक्षणाच्या बाबतीत पैशाचा निधी मंजूर केला होता आणि त्यावर खर्च केलाच,खुप चांगली व्यवस्था शारीरिक धोरणाविषयी होती पण ती व्यवस्था स्वातंत्र्य प्राप्त झाल्या नंतर कमी अधिक होत गेली .....

नुकताच महालेखापालांनी (कॅग) ने विधिमंडळात क्रीडा धोरणाविषयी अहवाल सादर केला.१००% मधून १%ही निधी क्रीडा धोरणाला वापरला गेला नाही मग हा निधी गेला कुठे? हा प्रश्न आमच्या सारख्या खेळाडूंना पडला आहे ?

शारीरिक शिक्षणाचा विकास करायचा आहे किंवा क्रीडा धोरण आखायचे आहे तेव्हा माझं खेळाडू म्हणून वैयक्तिक मत असे आहे. एकदा तरी हंटर कमिशनच्या (१८८२) चा अभ्यास करावा,कमी तरतुदी होत्या पण खुप चांगल्या पद्धतीने राबविण्यात आल्या.की इंग्रज अधिकारी असले तरी त्यात आपल्या भारतीय व्यक्तींनी मते नोंदवली होती ह्या कमिशनला १३६ वर्षे लोटली गेली तरी क्रीडा क्षेत्राचा विकास का? रोखला गेला या प्रश्नाचे उत्तर मिळेल का?

जर एखादा खेळाडू हे मैदानात खेळण्याचा माझा जन्म सिद्ध हक्क आहे, तो मी प्राप्त करणारचं असे म्हटलं तर हसू येईल. कोणी लोकमान्य टिळक व्हायला तयार नाही. लोकमान्य व्हायला हवेत. ...क्रिडा क्षेत्राच्या विकासासाठी !

शारीरिक शिक्षण देण्यास तयार नसाल तर ऑलिम्पिक पदकाची आशा का करतात? लहान मुलांचा खेळण्याचा हक्क आहे. त्यांना मैदानावर येऊ द्या. त्यांना रोज मोठा शिक्षणाचा बोजा नको. आता पासूनच छळ केला तर ह्या मुलांचं आयुष्य पुढे काय राहील..?

एक इंग्रज म्हणतो ‘like this indian sports’

तो म्हणतो ’काय भारतीयांचे खेळ आहे. योग्य दिशादर्शन,गती चपळता, मिश्रण, घट्ट पकड,मजबूत ताकद,योग्य शरीर रचना, योग्य व्युरचना, मसुदी निर्णय क्षमता, व्वा ! जर हेच ब्रिटिशांच्या कडे असते तर जगावर क्रीडा क्षेत्रात राज्य केलं असतं. एक इंग्रज खेळ भारतात पहिल्या क्रमांकावर विराजमान आहे.मग भारताचा खेळ इंग्लिश राज्यात कितव्या क्रमांकावर आहे.हा प्रश्न उपस्थित होतो पण सत्य तर हे आहे महाराष्ट्राचा खेळ आपल्यालाच माहीत नाही. दुर्दैवाने सांगावं लागतं . का माहीत नाही? यांची कारणं पहा. शालेय जीवनातूनच पूरक अश्या शारीरिक शिक्षणाची अंमलबजावणी केली गेली नाही.

शारीरिक शिक्षण शालेय अभ्यासक्रमातून वगळण्यात यावे अशी वेळ यायला नको. धोरण निश्चित करायला हवे.

१८८२ सारखी शारीरिक शिक्षण व्यवस्था राबवायला हवी.

‘शारीरिक क्रीडा शिक्षण’ या अभ्यासक्रमाची सुरवात करावी.

चुकीच्या शारीरिक शिक्षणाच्या धोरणामुळे पालक वर्गही क्रीडा क्षेत्राकडे पाठ फिरवत आहे. त्यांनीही आपल्या मुलांवर पुस्तकी शिक्षणशाही राबवली. अनेक पालकांना असं वाटतं की मुलांचे भविष्य क्रीडा क्षेत्रात नाही, असं का ? होतंय. क्रिडा क्षेत्राकडे बघण्याचा नकारात्मक दृष्टिकोनाने सुदृढ भारतीयांचे भविष्य नक्कीच अंधारात जाईल यात शंका नाही.

**(प्रा.डॉ. एल.के.प्रताळे हे एस.पी.डी.एम. महाविद्यालय शिरपूर जि.धुळे येथे क्रिडा विभाग**

मासिक
# शिक्षण यात्री

## शिक्षणयात्री मासिकाच्या वतीने यशस्वी विद्यार्थ्यांचे हार्दिक अभिनंदन

खान्देशात प्रथम



**समीक्षा विजय लुल्हे**
ब.गो.शानबाग विद्यालय
सावखेडा जळगांव
दहावी (९९.८०%)

धुळे जिल्ह्यात प्रथम



**तनिष्क प्रविण देवरे**
मयुर शैक्षणिक ट्रस्ट
धुळे
दहावी (९८.८०%)



**मंदार रमेश चौधरी**
सातपुडा माध्य.विद्यालय
शहादा जि.नंदुबार
दहावी (९३.४०%)



**निर्मिती प्रदीप गहिवरे**
एच.आर.पटेल माध्य.विद्यालय
शिरपूर जि.धुळे
दहावी (९४.००%)



**आर्या योगेश काकुळदे**
एच.आर.पटेल माध्य.विद्यालय
शिरपूर जि.धुळे
दहावी (९३.८०%)



**धनश्री अशोक अहिरे**
पां.बा.हायस्कूल
शिरपूर जि.धुळे
दहावी (९२.००%)



**भावेश देविदास निळे**
आर.सी.पटेल माध्य.विद्यालय
शिरपूर जि.धुळे
दहावी (९१.४०%)



**वनमाला एकनाथ गांगुर्डे**
शांताई एज्युकेशन सोसायटी
पिंपळनेर जि.धुळे
दहावी (८६.२०%)



**विनेश शांतीलाल पावरा**
एम.आर.पटेल मिल्ट्री स्कूल
शिरपूर जि.धुळे
बारावी (७३.८०%)

## वाढदिवसाच्या लाख लाख शुभेच्छा !



**रूपेश जवाहरलाल जैन**
२० ऑगस्ट



**अशोक धनसुकलाल ढिवरे**
१८ ऑगस्ट



**रघुनाथ रमेश ठाकरे**
१९ ऑगस्ट


## शिक्षणयात्री सुवर्ण पान योजना...

वर्गणीदारांसाठी सुवर्ण संधी आपला जन्मदिवस,मिळविलेले यश, स्तुत्य निवड शिक्षणयात्री सन्मान पानावर प्रकाशित होईल या संदर्भात नाव/फोटो,तपशिल संपर्क क्रमांक कळविणे आवश्यक.

9850964601 email:shikshanyatri11@gmail.com

Reg No. MAHMAR2015/67226

मासिक शिक्षण यात्री ऑगस्ट २०२०

Postal Registration No.DHL/557/2018-20










# सहकार्याचे विनम्र आवाहन...

शिक्षण यात्री मासिक नियमित प्रकाशन करताना होणारी आर्थिक कसरत पहाता आपणांस वर्गणीदार होऊन शिक्षण यात्री मासिकास आर्थिक स्थैर्य मिळवून देण्याची कळकळीची विनंती!!!!

वार्षिक वर्गणी- ५०० रूपये   द्विवार्षिक वर्गणी - १००० रूपये   त्रैवार्षिक वर्गणी-१५०० रूपये

शिक्षण यात्री या नावाने चेक/मनीआर्डर पोस्टाने पाठवू शकतात.

Online पेमेंट साठी--- खाते नाव-शिक्षणयात्री Shikshanyatri

बँक ऑफ बडोदा (राष्ट्रीय कृत) No--13320200000322 Ifsc-BARB0SHIRPU

PhonePe
ACCEPTED HERE

**....वर्गणी पाठविल्यास पत्ता व जमा पावती बाबत कळविणे....**

संपर्क पत्ता- संपादक शिक्षण यात्री क्रांतीनगर मु.पो.ता.-शिरपुर जि-धुळे ४२५४०५

(मोबा.८२०८३०१००१/९८५०९६४६०१)

Postal Registration No.DHL/557/2018-20

प्रेषक
संपादक -२९,क्रांतीनगर,१ली गल्ली,
शिरपूर ता.शिरपूर जि.धुळे
भ्रमणध्वनी : ८२०८३०१००१

प्रती, ..................................................

..................................................

..................................................

Pragati Arts Shirpur 8421356261